जिल्ह्यातील निकडीच्या प्रश्नांना वाचा फोडणारे एकमेव दैनिक




# नवा मराठा

फोन–२४१४१४१, २४१७७७७

भाडोत्री म्हणून वर्षानुवर्ष जगण्यापेक्षा निर्भिड म्हणून क्षणभर जगण्यात जीवनाचे खरे सार्थक आहे. – कै.आचार्य गुंदेचा

email - navamaratha@gmail.com


# मार्केटयार्ड मधील ८ दुकानांतील चोऱ्यांचा तातडीने तपास लावावा रात्रीची गस्तही वाढवा : व्यापाऱ्यांचे पोलिस अधिक्षकांना निवेदन



मार्केटयार्ड मधील ८ दुकानांतील चोऱ्यांचा तातडीने तपास लावावा व या परिसरात रात्रीची गस्त वाढवावी या मागणीचे निवेदन पोलिस अधिक्षक सोमनाथ घार्गे यांना देताना व्यापाऱ्यांचे शिष्टमंडळ. (छाया – लहू दळवी)

नगर – शहरातील मार्केट यार्ड मधील भुसार विभागातील ८ दुकाने चोरट्यांनी २ जुलै रोजी पहाटेच्या सुमारास फोडून मोठ्या प्रमाणात रोकड चोरून नेलेली आहे. या चोऱ्यांमुळे व्यापारी वर्गात घबराट पसरलेली असून पोलिसांनी तातडीने या चोऱ्यांचा तपास लावून व्यापाऱ्यांना मुद्देमाल मिळवून द्यावा, तसेच पुन्हा अशी घटना घडू नये म्हणून मार्केट यार्ड परिसरात रात्रीची गस्त वाढविण्यात यावी अशी मागणी व्यापाऱ्यांच्या शिष्टमंडळाने पोलिस अधिक्षक सोमनाथ घार्गे यांच्या कडे निवेदनाद्वारे केली आहे.

मार्केट यार्ड परिसरातील व्यापाऱ्यांनी ४ जुलै रोजी पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे यांची भेट घेवून निवेदन दिले. यामध्ये म्हंटले आहे की, मार्केट यार्ड परिसरात रोज लाखों चे व्यवहार होत असतात. परंतु या घटनेमुळे व्यापारी वर्गात भीतीचे वातावरण आहे. त्यामुळे सदरील घटनेत गांभीर्याने लक्ष घालून व्यापाराचे नुकसान लक्षात घेऊन लवकरात लवकर आरोपी पकडावेतव व्यापाऱ्यांना त्यांचा मुद्देमाल परत मिळावा.अन्यथा ८ दिवस नंतर अहिल्यानगर कृषी उत्पन्न बाजार समिती मधील व्यापाऱ्यांना बाजारपेठ बंद पुकारावा लागेल. याची संपूर्ण जबाबदारी कृषी उत्पन्न बाजार समिती व कोतवाली पोलीस स्टेशनची राहील. असा इशाराही या निवेदनात देण्यात आला आहे. मार्केट यार्ड परिसरामध्ये पोलिसांनी रात्रीची गस्त वाढवावी.या मागणीसाठी हिंदुत्ववादी कार्यकर्ते कुणाल भंडारी यांच्या नेतृत्वाखाली मार्केट यार्ड येथील व्यापाऱ्यांच्या वतीने जिल्हा पोलीस अधिक्षकांना निवेदन देण्यात आले.

याप्रसंगी मार्केटयार्ड परिसरातील व्यापारी राजेंद्र चोपडा, विजय कोथिंबीरे, प्रवीण गांधी, ललित गुगळे, सुनील कटारीया, राजेंद्रकुमार गुगळे, मानकचंद भंडारी, रूपचंद गुगळे, वामन थोरात, शैलेश कुमार गांधी, भारती ट्रेडिंग कं., नवकार पशुखाद्य, सुभाष चौरे, हिरालाल चोपडा, अमृत ट्रेडिंग कंपनी, प्रदीपकुमार संदीपकुमार, भागवत कोथिंबीरे, सूर्यकांत मुथा, अक्षय कुमार पुंगलिया, अभय कुमार पुंगलिया, विजय कटारिया, विकेश गुंदेचा, जवाहर चंगेडिया, धनेश कटारिया, राजेशकुमार भंडारी, सुभाषचंद्र पोखरणा, गोपाळ ट्रेडर्स, हर्षकांत ललित कुमार, संजय भंडारी, राजमल चंगेडिया, हर्ष चंगेडिया, हंसराज कर्नावट, मोतीलाल गांधी, हिरालाल लुणिया, संतोषकुमार सतीशकुमार, गौतमचंद दलिचंद, किशोर कटारिया, नितेश किशोर कटारीया, एसपी ट्रेडर्स, विजय गांधी, सार्थक भगवानदास, सतीशकुमार शरदकुमार, राधेश्याम बंग, नवकार आहार, मनसुखलाल गांधी आदींसह व्यापारी उपस्थित होते.

## पोलिसांनी चोरीचा मुद्देमाल कमी दाखविल्याची तक्रार

मार्केट यार्ड मध्ये झालेल्या चोरीत नवकार पशु खाद्य ६ हजार ५००, अभयकुमार जयकुमार पुंगलिया ३ हजार ५००, विजय शांतीलाल कटारिया अंदाजे १५००रुपये, नितीन शांतीलाल कटारिया ६ लाख ६५ हजार, भागवत नारायण कोथिंबीर १२ हजार, मानकचंद उत्तमचंद भंडारी १२०० रुपये, सोलाट अँड कंपनी ७०० रुपये शिवम सेल्स २० हजार रुपये रोख रक्कम आणि इतर मौल्यवान वस्तू चोरीला गेलेल्या आहेत. सदरील चोरी ची तक्रार २ जुलै रोजी कोतवाली पोलीस स्टेशन येथे दिलेली आहे. परंतु सदरील तक्रारीत पोलीस अधिकाऱ्याकडून चोरी झालेल्या मुद्देमालापेक्षा अगदी नगण्य म्हणजे ६ हजार ५०० रुपये एवढीच रक्कम दाखवली आहे. तरी आपण या तक्रारी ची पूर्ण माहिती घेऊन योग्य कारवाई करावी, अशी मागणीही व्यापाऱ्यांनी निवेदनात केली आहे.

# प्रेरणादायी अक्षरधन...






## ज्ञानदेवांचा आत्मसंवाद

वि. रा. करंदिकरांच एक श्रेष्ठ अवलोकन. आषाढ महिना बहरत चाललेल्या निसर्गासह वारकरीही दंग होत पंढरपुरी धावत आहेत.

भोळ्या भाबड्या भक्तीसह वारकऱ्यांसह आपणा सर्वांनी अध्यात्मिक उंचीही गाठण्याचा प्रयत्न करायला हवा असे मनापासून वाटतय. कारण भक्तीसह योग्य ज्ञान असल्यास भक्तीला अधिक गरीमा प्राप्त होणे शक्य. या दृष्टीने ज्ञानाचा मार्ग माऊली ज्ञानेश्वरांनी दाखवला.

माऊलींनी लिहिलेले ३ मुख्य ग्रंथांना संवादांचे प्रमुख अधिष्ठान आहे. भावार्थ दीपिका हा श्रोतुसंवाद, चांगदेवपासष्टी हा मित्र संवाद. आत्मवस्तुविषयक संवाद म्हणूनही तो आत्मसंवाद. जनमानसात हा ग्रंथ अमृतानुभव म्हणून पिरिचीत. अशा या अमृतानुभवाचे तत्त्वज्ञान, साहित्यकृती व व्यक्तीमत्त्वाचा अविष्कार अशा त्रिविध अंगांनी दर्शन करण्याचा हा लेखकाचा प्रयत्न आहे.

इंद्रिय विषयाच्या आकर्षणातून मन मागे फिरणे, वासनेचा संपूर्ण निचरा होणे व वैराग्याचे भावना अंगी भिनणे ही अध्यात्मिक जीवनाची पहिली पायरी असते.

त्यनंतर साधना व ज्ञानप्राप्तीच्या मार्गाने पुढचा प्रवास व्हावयाचा असतो. वैराग्याची पहिली पायरी आपली करण्यासाठी मुमुक्षांना (वारकऱ्यांना) जीवाचे रान करावे लागते.

अध्यात्मिक अनुभवात रमलेल्या, आत्म्याच्या योगे, आत्म्याच्या ठायी संतुष्ट असलेल्या स्थितप्रज्ञाला चित्ताची एक प्रसन्नता लाभते. चित्ताच्या प्रसन्नतेमुळे लौकीक पातळीवरील प्रसंगातून उत्पन्न होणाऱ्या साऱ्या दुःखाचा निरास होतो असे श्रीकृष्णाने वर्णिले आहे.

दुःखाचा दारुण अनुभव घेतल्या शिवाय विभूतीमत्त्वचा रस्ता सुखाच्या सावलीतून जात नाही. ज्ञानदेव माऊलींनी श्रेष्ठत्त्वाची पदवी प्राप्त करुन घेण्यापूर्वी त्याची किंमत चुकती केली आहे. यच्चयावत मानवमात्राबद्दल वाटणारी करुणा हा त्यांच्या व्यक्तीमत्त्वातील असामान्य विशेष त्यांच्या जीवनात घ्याव्या लागणाऱ्या विविध प्रकारच्या अनुभवांमुळे उत्पन्न झाला असावा. आषाढीएकादशी सोडून नियमित ज्ञानेश्वरांचे उपरोक्त ३ ग्रंथांचे वाचन, चिंतन, मनन करणे आवश्यक.

# मार्केटयार्ड मधील दुकानांत चोरी करणारे दोघे पकडले

### साकत व देहरे येथील मेडिकल दुकानांच्या चोऱ्याही उघड, स्थानिक गुन्हे शाखेची कारवाई

नगर – नगरच्या मार्केट यार्डमधील भुसार विभागातील ८ दुकाने फोडून चोरी करणारे दोन आरोपी स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने पकडले आहेत, तर त्यांचा एक साथीदार पसार झाला आहे. या चोरट्यांकडून मार्केट यार्ड सह नगर तालुक्यातील साकत व देहरे गावात मेडिकल दुकानांत केलेल्या चोऱ्याही उघड झाल्या आहेत. अकबर लुकमान खान (वय ३३, रा.दौला वडगाव, ता.आष्टी, जि.बीड), आर्यन पप्पु शेख (वय १९, रा.दौलावडगाव, ता.आष्टी, जि.बीड) अशी पकडलेल्या आरोपींची नावे आहेत. तर समीर बालम शेख (रा.मुकूंदनगर, अहिल्यानगर) हा फरार झाला आहे.

मार्केट यार्डमधील भुसार विभागातील ८ दुकाने २ जुलै रोजी पहाटे अज्ञात चोरट्यांनी फोडून चोरी केली होती. याबाबत संजय चुनिलाल लुनिया (वय ६१, रा.आनंदधाम, अहिल्यानगर) यांच्या फिर्यादी वरून कोतवाली पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे. पोलीस अधिक्षक सोमनाथ घार्गे यांच्या आदेशानुसार स्थानिक गुन्हे शाखेचे पो.नि. दिनेश आहेर यांनी पोलीस अंमलदार बापुसाहेब फोलाणे, संदीप पवार, शाहीद शेख, मयुर गायकवाड, रविंद्र घुंगासे, फुरकान शेख, प्रशांत राठोड व महादेव भांड यांचे पथक नेमून समांतर तपास सुरु केला होता.

सदर पथक गोपनीय माहिती व तांत्रिक विश्लेषणाच्या आधारे सदर गुन्हयाचा तपास करत असताना ३ जुलै रोजी त्यांना गोपनीय माहिती मिळाली की, सदरचा गुन्हा हा अकबर लुकमान खान व त्याचे साथीदारांनी केला असून ते मोटार सायकलवर राधाबाई काळे महिला महाविद्यालय परिसरात येणार आहेत. ही माहिती मिळताच पथकाने तात्काळ नमूद ठिकाणी सापळा रचुन संशयीत आरोपीचा शोध घेत असताना संशयीत आरोपी अकबर लुकमान खान व आर्यन पप्पु शेखयांना पकडले तर समीर बालम शेख हा पसार झाला. ताब्यातील आरोपींकडे कसून चौकशी केल्यावर त्यांनी मार्केट यार्ड मधील दुकानांत चोरी केल्याची कबुली दिली. ४–५ दिवसांपूर्वी नगर तालुक्यातील साकत व मागील दोन महिन्यापुर्वी देहरे येथील मेडीकल दुकानाचे पत्रे उचकटून चोरी केल्याची माहिती सांगीतली. आरोपीने दिलेल्या माहितीवरून खालीलप्रमाणे ३ घरफोडीचे गुन्हे उघडकीस आले आहेत. ताब्यात घेतलेल्या आरोपींना पुढील तपासासाठी कोतवाली पोलिसांच्या ताब्यात देण्यात आले आहे.



मार्केट यार्ड मधील दुकानांत चोरी करणारे दोघे आरोपी पकडल्यानंतर त्यांच्या समवेत स्थानिक गुन्हे शाखेचे पथक.

# निंबळक बायपासवरील अपघतात एकाचा मृत्यू

नगर – निंबळक बायपास रोडवर राजस्थानी हॉटेल समोर झालेल्या अपघातात निलेश सीताराम घोलप (वय ३९, रा.टाकळी खातगाव, ता.नगर) यांचा मृत्यू झाल्याची घटना ३ जुलै रोजी रात्री ९.३० च्या सुमारास घडली.

मयत घोलप हे दुचाकीवरुन जात असताना त्यांना अज्ञात वाहनाने धडक दिली. त्यात ते गंभीर जखमी झाले. त्यांना त्यांचे भाऊ नंदकुमार सीताराम घोलप यांनी उपचारासाठी जिल्हा शासकीय रुग्णालयात दाखल केले. मात्र उपचारापुर्वीच त्यांचा मृत्यू झाला असल्याचे वैद्यकीय अधिकारी डॉ. खराडे यांनी घोषित केले. याप्रकरणी जिल्हा रुग्णालयातून आलेल्या अहवालानुसार एमआयडीसी पोलिस ठाण्यात आकस्मात मृत्युची नोंद करण्यात आली असून नातेवाईकांच्या फिर्यादीवरुन गुन्हा दाखल करण्यात येणार असल्याचे पोलिसांनी सांगितले.

## कायनेटिक चौकात गळफास घेत आत्महत्या

नगर – राहते घरामध्ये छताला गळफास घेऊन संतोष प्रल्हाद वायदांडे (वय ४२, रा. खैरे चाळ, रेल्वे स्टेशनरोड, कायनेटीक चौक, अ.नगर) यांनी आत्महत्या केल्याची घटना ३ जुलै रोजी दुपारी १२.३० च्या सुमारास घडली.

संतोष वायदांडे यांनी गळफास घेतल्याचे निर्दशनास येताच त्यांचा मुलगा साहिल याने त्यांना औषध उपचाराकरिता जिल्हा शासकीय रुग्णालयात दाखल केले. तेथील डॉक्टरांनी त्यांना तपासून ते उपचारापूर्वीच मयत झाले असल्याचे घोषित केले. वायदांडे यांच्या आत्महत्येचे कारण अद्याप स्पष्ट झाले नाही. याप्रकरणी कोतवाली पोलीस ठाण्यात आकस्मात मृत्यूची नोंद करण्यात आली आहे. पुढील तपास पोलीस हवालदार दाणी हे करीत आहे.

# ‘ऑनलाईन फसवणूक’ झालेल्या रकमेची भरपाई बँकेने खातेदारास द्यावी; अहिल्यानगर ग्राहक आयोगाचा आदेश

नगर – येथील बिल्डर प्रकाश संचालाल जैन यांना बँक ऑफ इंडिया शाखा तेलीखुंट यांनी बचत खात्यातुन ऑनलाईन फसवणुकीद्वारे वजावट झालेली रक्कम रुपये ७४,९३८ द्यावी, तसेच फसवणुकीची १६ ऑक्टोबर २०२२ रोजीपासुन संपुर्ण रक्कम त्यांना मिळेपावेतो द.सा.द.शे. ६% दराने व्याज द्यावे तसेच तक्रारदारास झालेल्या शारीरीक व मानसिक त्रासापोटी रुपये १०,००० व तक्रारीचा खर्च रुपये ७,००० अशी मिळून होणारी संपुर्ण रक्कम आदेशाची प्रत मिळालेपासुन ३० दिवसाचे आत तक्रारदारास देण्याचा आदेश अहिल्यानगर जिल्हा ग्राहक तक्रार निवारण आयोगाचे अध्यक्ष श्रीमती प्रज्ञा देवेंद्र हेंद्रे, सदस्या श्रीमती चारु विनोद डोंगरे व सदस्या श्रीमती संध्या श्रीपती कसबे यांनी आहे.

अहिल्यानगर येथील बिल्डर प्रकाश जैन हे १६ ऑक्टोबर २०२२ रोजी मिठाई खरेदी करण्यासाठी गेले असता ऑनलाईन पेमेंट करतांना त्यांच्या खात्यामध्ये रक्कम शिल्लक नसल्याचे नोटीफिकेशन मोबाईलवर प्राप्त झाले त्यामुळे नाईलाजाने त्यांना रोख रक्कम अदा करावी लागली. घरी जाऊन नेट बँकींगद्वारे बँक ऑफ इंडिया मधील बचत खात्यातील रकमांचे अवलोकन केले असता त्यांचे खात्यातुन १५ ऑक्टोबर २०२२ व दि. १६ ऑक्टोबर २०२२ रोजी एकुण ७ वेळेस जैन संमतीविना रक्कम रुपये १,५६,०४७ परस्पर वजा झाल्याचे समजले. याबाबत त्यांना कोणताही ओटीपी मोबाईलवर प्राप्त झालेला नाही, अथवा त्यांनी कोणालाही ओटीपी दिलेला नाही, त्यामुळे श्री. जैन यांनी बँकेत जाऊन तक्रार केली व रकमेची मागणी केली तसेच सायबर पोलीस स्टेशन यांचेकडे फिर्याद दाखल केली. सदरील घटनेबाबत भारतीय रिझर्व्ह बँक आणि बँकींग लोकपाल यांचेकडे देखील तक्रार दाखल केली.

वेळोवेळी पाठपुरावा करुनही बँकेने केवळ रक्कम रुपये ७२,५०७ त्यांचे खात्यात जमा केली परंतू उर्वरीत रक्कम रुपये ७४,९३८ दिली नाही म्हणून ॲड.सुनिल बी. मुंदडा यांचेमार्फत ग्राहक आयोगामध्ये तक्रार दाखल केली.

बँकेस ग्राहक आयोगाने नोटीस पाठविली, बँकेने कैफियत दाखल करुन बचत खात्याचा विमा असल्याने विमा कंपनीमार्फत जेवढी रक्कम आली ती अर्जदाराच्या खात्यात जमा केली आहे परंतू ऑनलाईन फसवणुकीला तक्रारदार हेच जबाबदार असुन निष्काळजीपणामुळे त्यांची फसवणुक झाली त्यामुळे उर्वरीत रकमेचा क्लेम विमा कंपनीने नाकारला आहे असे सांगुन तक्रार रद्द करावी असा बचाव घेतला.

दोन्ही बाजुचे शपथपत्र आणि दाखल कागदपत्रे, युक्तीवाद यावरुन ग्राहक आयोगाने न्यायनिर्णयासाठी मुद्दे उपस्थित केले आणि त्याचे होकारार्थी निष्कर्ष काढून अंतिम आदेशाप्रमाणे श्री. जैन यांचा तक्रार अर्ज मंजुर करुन वरीलप्रमाणे आदेश पारीत केलेला आहे.

अहिल्यानगर मधील सध्याच्या बँकेतील ग्राहकांच्या खात्यामध्ये ऑनलाईन फसवणुकीद्वारे मोठयाप्रमाणावर रकमेची वजावट होऊन कष्टाने मिळवलेल्या व बचत केलेल्या रकमेची कोणतीही सुरक्षीतता राहिलेली नाही. त्यामुळे बँक ग्राहकांमध्ये भितीचे वातावरण आहे. परंतू ऑनलाईन पध्दतीने फसवणुक झाल्यास त्यास बँकच जबाबदार आहे. ग्राहकाचे पैसे सुरक्षीत ठेवणे हा केवळ सौजन्याचा भाग नसुन बँकेची ती मुलभुत जबाबदारी आहे, ग्राहकांना फसवणुकीपासून सुरक्षीत ठेवण्यासाठी मजबुत प्रणाली बँकेने स्विकारली पाहिजे असे निर्देश नुकतेच सर्वोच्च न्यायालयाने दिलेले असुन त्याचा आधार घेऊन बँक ग्राहकांना व खातेदारांना मार्गदर्शन होईल असा आदेश ग्राहक आयोगाने दिलेला आहे.

## वाहनाची महात्मा फुले चौकातील ५ वाहनांना धडक; गुन्हा दाखल

नगर – एका भरधाव वेगाने येणाऱ्या चारचाकी वाहनाने रस्त्यावरील पाच वाहनांना धडक दिल्याची घटना ३ जुलै रोजी सायंकाळी सव्वापाच ते साडेपाच वाजण्याच्या सुमारास मार्केटयार्ड मागील महात्मा फुले चौक येथे घडली. या अपघातात कोणालाही दुखापत झाली नसली तरी वाहनांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले.

या बाबत कोतवाली पोलीस ठाण्याचे पोलीस नाईक प्रशांत बोरुडे यांनी फिर्याद दिली. फिर्यादी व पोलीस हवालदार विजय काळे हे वाहतूक नियमन व पेट्रोलिंग करत असताना त्यांना माहिती मिळाली की, महात्मा फुले चौकात एक अज्ञात वाहन चालक भरधाव गाडी चालवत असून अनेक वाहनांना धडक दिली आहे. अशी माहिती मिळताच त्यांनी त्वरित घटनास्थळी धाव घेऊन खात्री केली असता एक अशोक लेलँड इकोमेट चारचाकी (क्र. एम एच १४ एल बी ४९४७) गाडीची धडक पाच वाहनांना बसल्याचे आढळून आले.पोलिसांनी गाडी चालक राहुल अशोक शिरसाठ (वय ४५, रा. आर्वी, ता. जुन्नर, जि. पुणे) यास ताब्यात घेतले.

या प्रकरणी पोलीस नाईक प्रशांत बोरुडे यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन चालक राहुल शिरसाठ याच्याविरुद्ध भारतीय न्याय संहिता कलम २८१, १२५, ३२४(४) व मोटार वाहन कायदा कलम १८४ अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

## प्रतिभा भालेराव यांचे अल्पशा आजाराने निधन



नगर – खालकर हॉस्पिटल, वायएमसीए मैदानाजवळ, अहिल्यानगर येथील रहिवाशी प्रतिभा मोहित भालेराव (वय ५५) (मूळ रा. इंदोर मध्य प्रदेश) यांचे २ जुलै रोजी निधन झाले. नगर येथील स्मशानभूमीत त्यांच्या पार्थीवावर अंत्यसंस्कार करण्यात आले.

त्यांच्या पश्चात पती, १ मुलगा, १ मुलगी असा परिवार आहे.

## लक्ष्मीबाई घुगे यांचे वृध्दापकाळाने निधन



श्रीरामपूर – येथील लक्ष्मीबाई दशरथ घुगे (वय ८५) यांचे वृध्दापकाळाने निधन झाले. त्यांच्या पश्चात एक मुलगा, एक मुलगी, सून, जावई, नातवंडे असा परिवार आहे. मेनरोड येथील सोमनाथ गॅस सर्व्हिसेस व लक्ष्मी गॅस ॲण्ड किचन वेअरचे मालक सोमनाथ घुगे यांच्या मातोश्री होत.

मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक सुभाष चंदनमल गुंदेचा यांनी नवा मराठा मुद्रणालय, आचार्य गुंदेचा चौक, अहिल्यानगर येथे हे पत्र छापून येथेच प्रसिद्ध केले.

# नगर शहर परिसरात बिबट्यांचा वावर मोठ्या प्रमाणात वाढला

(पान १ वरुन)

## १५ दिवसांत एकाच ठिकाणी २ बिबटे जेरबंद

त्यातील एक बिबट्या १७ जून रोजी पहाटेच्या सुमारास या पिंजऱ्यात जेरबंद झाला होता. त्यानंतर पुन्हा दुसरा पिंजरा तेथे लावण्यात आला, त्यात आणखी एक बिबट्या आज ४ जुलै रोजी पहाटे जेरबंद झाला आहे. या परिसरात राहणारे शक्ती माळी यांना पिंजऱ्याच्या बाजूने डरकाळी ऐकू आल्यावर त्यांनी जवळ जावून पाहिले असता तो पिंजऱ्यात जेरबंद झाल्याचे दिसून आले. या बिबट्याने पिंजऱ्याला अनेकदा हुलकावणी दिली होती. त्यामुळे पोपट बंडू माळी यांनी शक्कल लढवत मुख्य पिंजऱ्यातच २ कोंबड्या बांधून ठेवल्या होत्या. त्यांना खाण्यासाठी बिबट्या आत गेला आणि जेरबंद झाला. ही माहिती वनविभागाला देण्यात आल्यानंतर वन परिक्षेत्र अधिकारी अविनाश तेलोरे यांच्या मार्गदर्शनाखाली वनपाल नितीन गायकवाड, वनरक्षक सुनिल धोत्रे, विजय चेमटे, बाळू रणसिंग, चालक संदीप ठोंबरे, वनसेवक सुभाष हंडोरे तसेच वन्यजीव अभ्यासक हर्षद कटारिया, प्राणीमित्र सचिन क्षीरसागर, यशोदीप गोरे, हेमंत जाधव यांनी तेथे धाव घेत पाहणी केली. त्यावेळी नर बिबट्या जेरबंद झाल्याचे त्यांच्या निदर्शनास आले. त्यांनी तो बिबट्यासह पिंजरा वाहनात घालून बिबट्याला नैसर्गिक अधिवासात सोडण्यासाठी घेवून गेले.



कल्याण रोड बायपास जवळ वाहनाच्या धडकेत मयत झालेला बिबट्या.

## बायपास रस्त्यावर वाहनाच्या धडकेत बिबट्याचा मृत्यू

वनविभागाचे पथक सोनेवाडी येथे असतानाच त्यांना बायपास रस्त्यावर एक बिबट्या मृतावस्थेत पडलेला असल्याची माहिती मिळाली. त्यामुळे हे पथक तातडीने कल्याण बायपास चौकातील उड्डाणपुलाच्या पुढे त्या ठिकाणी गेले. त्यांनी मृत बिबट्याची पाहणी केली असता अज्ञात चारचाकी वाहनाची धडक बसून त्याचा मृत्यू झाला असल्याचे त्यांच्या निदर्शनास आले. त्यांनी त्या मृत बिबट्याला वाहनात टाकून शेंडी जवळील नर्सरीत शवविच्छेदन करण्यासाठी नेले. या बिबट्याचा मृत्यू साधारण पहाटे ४ ते ६ वाजेच्या दरम्यान झाला असावा अशी शक्यता वनविभागाच्या पथकाने वर्तविली.

## काळेवाडी व कापूरवाडी येथेही बिबट्याचा वावर

नगर तालुक्यातील सारोळा कासार शिवारात असलेल्या बारेमळा येथील ऊसाच्या शेतात २९ जून रोजी सायंकाळी बिबट्याची ४ पिल्ले आढळून आली होती. मात्र मादी बिबट्याने रात्रीतून पिल्लांसह स्थलांतर केले होते. त्यानंतर १ जुलै रोजी पहाटे काळेवाडी (हिवरे झरे) शिवारात एक बिबट्या दिसला होता. त्या ठिकाणी २ जुलै रोजी वनपाल शैलेश बडदे, वनरक्षक अशोक गाडेकर, वनसेवक अर्जुन खेडकर, तसेच वन्यजीव अभ्यासक हर्षद कटारिया यांनी ड्रोन कॅमेऱ्याद्वारे बिबट्याचा शोध घेण्यासाठी संपूर्ण परिसर पिंजून काढत त्या ठिकाणी पिंजरा लावलेला आहे. कापूरवाडी शिवारात तर यापूर्वीच पिंजरा लावण्यात आलेला आहे.

## बोल्हेगावच्या सीना नदीपुलाखाली ३ जुलैला भरदुपारी दिसला बिबट्या

नगर शहर परिसरात विशेषतः सीनानदीच्या पट्ट्यात गेल्या अनेक दिवसांपासून बिबट्यांचा वावर दिसून येत आहे. ३ जुलै रोजी तर भर दुपारी १२.३० वाजता बोल्हेगाव येथील सीना नदीच्या पुलाखाली बिबट्या दिसला होता. तेथे वनविभाग, पोलिसांसह ३०० ते ४०० लोकांचा जमाव जमला होता. मात्र काही वेळाने बिबट्याने तेथून पलायन केले. या शिवाय ५ जून रोजी पहाटेच्या सुमारास बालिकाश्रम रस्त्यावरील लेंडकर मळ्यात बिबट्याने शेतकरी अशोक चिपाडे यांच्या गोठ्यात बांधलेल्या गायीवर हल्ला करून तिचे लचके तोडले. या हल्ल्यात गायीचा मृत्यू झालेला आहे. तसेच रोहकले मळा, चिपाडे मळा,बोरुडे मळा,कातोरे वस्ती व सीना नदीच्या परिसरात अनेक वेळा बिबट्याचा वावर दिसून आलेला आहे. या शिवाय वडगाव गुप्ता शिवार, जेऊर परिसर, चांदबीबी महाल परिसर या भागात तर बिबटे कायमच आढळून येतात. नगर शहर परिसर आणि तालुक्यात बिबट्यांचा वावर वाढल्याने नागरिकांमध्ये विशेष करून शेतकरी वर्गात भीतीचे वातावरण पसरलेले असून वन विभागाने याबाबत तातडीने उपाययोजना कराव्यात अशी मागणी होत आहे.

# गृहिणी

## आरोग्य

### पोटदुखीवर घरगुती उपाय

साधारणपणे, पोटदुखी ही एक सामान्य गोष्ट आहे. ती कोणालाही होऊ शकते, परंतु कधीकधी असे होते की पोट अचानक दुखू लागते. अशा परिस्थितीत, पोटदुखीपासून आराम मिळवण्यासाठी काय करावे हे समजत नाही. गॅस किंवा ॲसिडिटी ही त्याची सर्वात मोठी समस्या आहे. अचानक होणाऱ्या पोटदुखीपासून तात्काळ आराम मिळवण्यासाठी घरगुती उपाय सर्वात प्रभावी आणि सुरक्षित आहेत. पोटदुखीपासून आराम मिळवण्यासाठी तुम्ही पुदिन्याची पाने वापरू शकता. यासाठी, हिरव्या पुदिन्याची ५-६ पाने घ्या आणि त्यांना काळ्या मीठाने हळूहळू चावा. यामुळे तुमच्या पोटात तयार होणारा वायू निघून जाईल आणि तुम्हाला वेदनांपासून आराम मिळेल. गॅसमुळे होणाऱ्या पोटदुखीपासून आराम मिळवण्यासाठी ओवा देखील प्रभावी ठरू शकते. यासाठी, १/४ चमचा ओवा कोमट पाण्यासोबत खा आणि काही वेळ डाव्या कुशीवर झोपा. यामुळे तुम्हाला पोटदुखीपासून आराम मिळेल.

## पाककला

### लसणाचे आयते

**साहित्य :** लसुन पात, २ हिरव्या मिरच्या, ५ ते सहा लसूण पाकळ्या, मीठ चवीनुसार, तेल, १ वाटी गव्हाचे पीठ, १ टीस्पून हळद, १ टीस्पून गरम मसाला, २ टेबलस्पून रवा,

**कृती :** सर्वप्रथम लसूण पात स्वच्छ करून धुवून घ्यावी त्यानंतर त्याचे बारीक काप करून मिक्सरच्या भांड्यात घ्यावे सोबतच हिरव्या मिरच्या लसूण पाकळ्या कोथिंबीर घालून मिक्सरमधून बारीक वाटून घ्यावे. बारीक करण्याकरता थोडेसे पाणी घालावे. त्यात आता मिक्सर मधले वाटण एका भांड्यात काढून घ्यावे आणि त्यामध्ये गव्हाचे पीठ आणि रवा घालावा. चवीनुसार मीठ गरम मसाला आणि हळद घालावी. आणि थोडेसे दही घालावे आता हे मिश्रण डोशाप्रमाणे बनवण्याकरता थोडेसे पाणी घालून त्याला पातळ करावे. आता तवा गरम करावा तवा गरम झाल्यानंतर त्यावर पळीने डोसा पसरवावा त्याप्रमाणे आयते पसरवून घ्यावे. एक बाजू चांगली खरपूस भाजल्यानंतर आहेत ते पलटावेत आणि दुसऱ्या बाजूनेही छान परतावे दोन्ही बाजूंनी तेल लावून घ्यावे हे आयते तुम्ही गरमागरम कोरडेच खाऊ शकता किंवा लोण्या सोबत किंवा शेजवान चटणी सोबतही खाऊ शकता.

## वास्तू

❋ घरात बाथरूम व शौचालय यासाठी चांगली दिशा उत्तर-पश्चिम आहे. बाथरूम चा दरवाजा पूर्व किंवा उत्तर भिंतीला योग्य असतो. खिडकी पूर्व, पश्चिम, उत्तर असावी.

❋ तुटलेल्या मूर्ती किंवा फोटो - मंदिरात भेगा असलेल्या मूर्ती अशुभ मानल्या जातात. त्या ताबडतोब काढून टाका.

❋ देवघर हे नेहमी सागवानी लाकडापासून बनवलेले असावे. देवघर ईशान्य कोपरा म्हणजे उत्तर-पूर्व दिशेला असावे.

## सल्ला

❋ मिरची कापल्यानंतर हाताला लिंबाचा रस चोळल्याने मिरचीची जळजळ होत नाही.

❋ मिक्सरच्या पात्यांना धार लावण्यासाठी त्यावर महिन्यातून एकदा किंवा दोनदा जाड मीठ लावावे.

## सौंदर्य

दह्यात तांदळाच्या दाण्या एवढा चुना मिसळून खाल्ल्याने दोन आठवड्यात शरीराचा रंग गोरा होतो.

**संकलक : ॲड. सौ. पूजा गुंदेचा**

## दैनिक पंचांग

शनिवार, दि. ५ जुलै २०२५

**---, शके १९४७ विश्वावसुनामसंवत्सर, आषाढ शुक्लपक्ष, स्वाती १९।५१, सूर्योदय ०६ वा. ३० मि. सूर्यास्त ०५ वा. ३९ मि.**

### राशिभविष्य

**मेष :** चांगले भोजन मिळेल. मौजमजेत दिवस व्यतीत होईल. एखाद्या महत्वाच्या व्यक्तीशी भेट झाल्याने आनंद होईल.

**वृषभ :** खाद्या महत्त्वाच्या व्यक्तीची भेट आपल्यासाठी आनंदाची ठरेल. धार्मिक कार्यांमध्ये खर्च होण्याची शक्यता आहे.

**मिथुन :** कला क्षेत्रात यश मिळण्याची शक्यता आहे. आपणास नवे वाहन मिळण्याची शक्यता आहे. मानसन्मानात वाढ होईल.

**कर्क :** एखाद्या जीवलगाबरोबर भागीदारीसाठी वैयक्तिक पातळीवर संबंध वाढविण्याचा प्रयत्न कराल. यशस्वी व्हाल.

**सिंह :** आपल्या जुन्या लोकांबरोबर किंवा आधार देणाऱ्या मित्रांना जोडणे या वेळी आपल्यासाठी फलदायी ठरेल.

**कन्या :** कौटुंबिक विषयांमध्ये पैसा खर्च होईल. व्यापार-व्यवसायात स्थिती संमिश्र राहील.

**तूळ :** इतर लोकांना आपल्या स्वतःच्या आवश्यकता व इच्छा सांगण्यासाठी ही उत्तम वेळ आहे.

**वृश्चिक :** आजचा दिवस कालच्या दिवसापेक्षा चांगला नसेल. आरोग्याची काळजी घ्या. व्यस्त राहाल.

**धनु :** मानसिक स्थिती आल्हाददायक राहील व वरिष्ठांबरोबर संपर्कात आल्याने प्रसन्न वातावरण राहील. संततीसौख्य लाभेल.


**मकर :** आपला जोडीदार आपणास भावनात्मक पाठबळ देईल. मित्रांमध्ये होणारे वाद आपल्या संबंधासाठी वाईट ठरतील.

**कुंभ :** आर्थिक विषयांमध्ये आपले प्रयत्न आपणास यश मिळण्याचे कारण ठरतील. वरिष्ठ अधिकाऱ्यांकडून समर्थन मिळेल.

**मीन :** आज आपणास कठोर श्रम करावे लागतील. काही निष्कारण चिंतांमुळे आपली व्यग्रता वाढेल.

**संकलक : ॲड. सौ. पूजा गुंदेचा**

## शब्दगंध क्र. ७२१३ सौ.शैलजा कुलकर्णी



**आडवे शब्द :-** १) अपमान; अवमान; अवहेलना ५) अधर्म; पातक ७) प्रत्येक महिन्याला ९) दरारा; धाक; जरब ११) हजामत; श्मश्रू १२) समुद्र; रत्नाकर; मकरालय १४) एक पक्षी; जंगली कबूतर १६) वाटणी; वाटप; वितरण १८) देखत; डोळ्यासमोर; प्रत्यक्ष २०) गोडी; चव; रुची २२) शंभर हजार; ध्यान २३) डावा; वाईट २४) ज्ञात; समजलेले २५) विनोबा भावे यांचा आश्रम असलेले विदर्भातील ठिकाण

**उभे शब्द :-** १) विष्णूचे एक नाव २) किल्ल्याभोवती खोदलेला चर ३) भय; भीती ४) नाव; गंधाचा टिळा ६) एक लिंबूवर्गीय फळ ८) कितीही मिळाले तरी तृप्त न होणारा १०) चामर; चवरी १३) खिडकी; वातायन; झरोका १४) पुरुषाचे एक वस्त्र; तुमान; विजार १५) फडशा; उत्पन्नाचा हिशोब; फैसला १७) परवानगीचे पत्र १९) यज्ञ; यजन; याग २१) लढाई; युद्ध; संगर

**शब्दगंध क्र. ७२१२ चे उत्तर**



**फिल्मीचक्कर क्र. ११९५ चे उत्तर**



# ❋ ❋ ❋ ❋ ❋ ❋ मुलांचे विश्व ❋ ❋ ❋ ❋ ❋ ❋

: संकलक : ॲड.सौ. पूजा गुंदेचा

**सुविचार :** चारित्र्याचा विकास हेच खरे शिक्षण होय.

## मुलांसाठी भन्नाट माहिती ज्ञानरंजन

### मंदिरात जाण्याचे काही वैज्ञानिक फायदे आहेत का?

सामान्यतः मंदिरात जाणे धार्मिकतेशी संबंधित असते. परंतु मंदिरात जाण्याचे काही वैज्ञानिक आरोग्य फायदे आहे. जर आपण दररोज मंदिरात गेलो तर अनेक प्रकारच्या आरोग्य समस्यांवर नियंत्रण मिळवता येते.

मंदिरात अनवाणी चालल्याने या ठिकाणाची सकारात्मकता ऊर्जा पायांमधून आपल्या शरीरात प्रवेश करते. अनवाणी चालल्याने पायांमध्ये असलेल्या दाब बिंदूंवर देखील दबाव येतो, ज्यामुळे उच्च रक्तदाबाची समस्या नियंत्रित होते.

दररोज मंदिरात जाऊन भुवयांच्या मध्ये कपाळावर टिळक लावल्याने आपल्या मेंदूच्या एका विशेष भागावर दबाव येतो. यामुळे एकाग्रता वाढते.

संशोधनात म्हटले आहे की जेव्हा आपण मंदिराची घंटा वाजवतो तेव्हा त्याचा आवाज आपल्या कानात ७ सेकंदांपर्यंत घुमतो. या दरम्यान, शरीरातील ७ आरामदायी बिंदू सक्रिय होतात. यामुळे ऊर्जा पातळी वाढण्यास मदत होते. मंदिरात हात जोडून पूजा केल्याने तळवे आणि बोटांच्या त्या बिंदूंवर दबाव वाढतो, जे शरीराच्या अनेक भागांशी जोडलेले असतात. यामुळे शरीराची कार्ये सुधारतात आणि रोगप्रतिकारक शक्ती वाढते. मंदिरात असलेले कापूर आणि हवनाचे धूर जीवाणू नष्ट करतात. यामुळे विषाणूजन्य संसर्गाचा धोका टळतो. याशिवाय मंदिराचे शांत वातावरण आणि शंखाचा आवाज मानसिकरित्या आराम देतो. यामुळे ताण कमी होतो. त्याचबरोबर दररोज मंदिरात जाऊन देवाची आरती केल्याने मेंदूचे कार्य सुधारते. यामुळे नैराश्य दूर होते.

### काशिदहन

चेदिदेशात पौंड्रकवंशात वासुदेव नावाचा एक राजा होऊन गेला. अज्ञानवशात स्वतःच्या क्षमता न जाणून घेताच मी भगवान विष्णूचा अवतार आहे, असे म्हणू लागला. एवढेच नव्हे, तर शंख, चक्र, गदा, पद्म ही भगवंतांची चिन्हेही त्याने धारण केली. मग त्याने श्रीकृष्णाकडे दूताकरवी निरोप पाठविला, की तुम्ही वासुदेव हे नाव, तसेच चक्र इत्यादी चिन्हे सोडावी व मला शरण यावे. श्रीकृष्णाने उलट निरोप पाठविला, की मी सर्व चिन्हे घालून उद्याच तुझ्या नगरीत येईन. तू सावध राहा.

त्याप्रमाणे श्रीकृष्ण गरुडावर बसून सर्व चिन्हांसह पौंड्रकाच्या राजधानीत पोचले. पौंड्रकाच्या मदतीसाठी काशिनरेश आपल्या महान सेनेसह आला. दोन्ही सेना कृष्णाच्या समोर उभ्या ठाकल्या. स्वतः पौंड्रक वासुदेव सर्व चिन्हे, गरुडध्वज, श्रीवत्सचिन्ह इत्यादींसह समोर आला. भगवानांनी एका क्षणात आपल्या शार्ङ्ग धनुष्यातून बाण सोडून शत्रूला घायाळ केले. गदा, चक्र यांनी सर्व सेनेचा नाश केला. आपल्या मित्राच्या मृत्यूचा बदला घेण्यासाठी काशिनरेश युद्धास सज्ज झाला.

भगवानांनी शा धनुष्यातून सोडलेल्या बाणांनी त्याचेही शिर कापून टाकले. मग श्रीकृष्ण द्वारकेस परत गेले. ते काशिनरेशाचे मस्तक उडून काशीस येऊन पडले होते. त्याच्या मुलाला कळले, की हे कृष्णाचे काम आहे. तेव्हा त्याने भगवान शंकराला प्रसन्न करून घेतले व वर मागितला, की कृष्णाच्या नाशाची काही योजना आखावी. त्यानुसार श्रीशंकरांनी अग्नीपासून एक अक्राळविक्राळ राक्षसी निर्माण केली. ती रागाने 'कृष्ण कृष्ण' म्हणत द्वारकेस पोचली.

भगवान श्रीकृष्णांनी तिच्यावर आपले सुदर्शनचक्र सोडले. त्या तेजाने ती राक्षसी जळू लागली व सैरावैरा धावू लागली. तिचा पाठलाग करीत ते चक्रही मागे जाऊ लागले. शेवटी हतबल झालेली ती राक्षसी काशीस येऊन पोचली. काशीतील सर्व सेना शस्त्रास्त्रे घेऊन त्या चक्राचा सामना करू लागली; पण त्या चक्राने सर्व सेनेला तसेच नगरीतील सर्व प्रजा, सेवक, हत्ती, घोडे यांना जाळून मगच ते शांत झाले व परत फिरून श्रीकृष्णांच्या हातात येऊन स्थिरावले.

## जीवन का अमृत (भाग १)



### सामाजिक आचरण और नैतिक जीवन

किसी प्रकार भी निरुत्साहित महसूस ना करो, बल्कि प्रेम और भक्ति से पवित्र भजन-सिमरन में समर्पित रहो। आपको हर प्रकार की दया, सहायता और मार्गदर्शन ऊपर से मिलते रहेंगे ।

अहंकार इस रूहानी रास्ते पर उन्नति का सचमुच एक बहुत बड़ा दुश्मन है। सतुरु के प्रति प्रेम, ईंटों के भट्ठे की आग जैसा है। यदि आग को बुझा दिया जाए तो ईंटें ठीक से नहीं पकती और ऐसा ही आध्यात्मिक क्षेत्र में होता है। नामलेवा को सतुरु के प्रति अपने प्रेम को बचा कर और छुपाकर रखना चाहिए, ताकि उसकी उन्नति चुपचाप होती रहे।

ध्यान-अभ्यास ४७

आपकी शिष्यों को दी गई यह सलाह उत्तम है कि वे बेकार के कामों में समय बर्बाद न करें, बल्कि इस बेशकीमती समय का लाभ उठाएँ, ताकि वे रूहानी तौर से तरक्की कर सकें। पर यह संसार हर तरह के इंसानों से भरा पड़ा है और आप उनके साथ, जितना भी संभव हो, प्रेम और नम्रता के साथ पेश आयें। यह अच्छी बात है कि आप भजन और सिमरन, दोनों अभ्यासों के प्रति समर्पित हैं और अपने अंतर में प्रभु के साम्राज्य को खोज रहें हैं। इन मंडलों में प्रवेश करने हमेशा की जिंदगी और स्थिरता प्राप्त होती है। कोई भी बाहरी कामकाज लंबे समय तक नहीं रहते और हमारे लिए सहायक नहीं हो सकते। अब समय है कि हम अवश्य ही अपनी आगे की जिंदगी के लिए कार्य करें ।

खुश हूँ कि आप संसार से विरक्त (अलग) होते जा रहें हैं। यहाँ के सारे संबंधी और जानकार, कर्मों के नियम के अनुसार, लेन-देन चुकाने के लिए बने हैं। यह खुशी की बात है कि आप बाहर से तो अपने संबंधियों और दोस्तों के साथ प्रसन्नता से निभा रहें हैं, परन्तु अंतर में आप तेजी से यह महसूस करने लगे हैं कि वे सब आपकी आत्मा के लिए परदेसी हैं।

यह आपकी आंतरिक उन्नति में सहायता करेगा और आपको संसार के आकर्षणों से बचाकर रखेगा। आपका रास्ता साफ है। प्रेम और विश्वास के साथ कार्य करते रहो और आप दिन-ब-दिन इस रास्ते पर उन्नति करेंगे और अंतर में चढ़ाई करेंगे। जितना भी समय मिले, उसे आप प्रेम तथा भक्ति से भजन-सिमरन में लगा सकते हैं। स्नेही पिता हमेशा अपने बच्चों की देखभाल करता है, उनके फायदे के लिए कार्य करता है और अपनी

(क्रमशः)

**(कृपाल आश्रम, अहिल्यानगर)**

## अंतरिक बल (भाग - २)

### आज्ञा चक्र

कि इसे पाने लिये दूसरे लोगो के पीछे भटकता रहता है। शांति की तरंगों से ऐसी सुगंध निकलती है जो सभी को अच्छी लगती है। इस से तनाव खत्म हो जाता है।

मन को चैन मिलता है। हिंसक भाव मिट जाते हैं। योगी जहां तपस्या करते हैं वहां हिंसक जीव जन्तु भी मिलजुल कर रहने लगते हैं। खुशी के संकल्पों से खुशबू निकलती है जिस से सभी उमंग उत्साह से भर जाते हैं। जिस घर में बचो की किलकारियां सुनाई देती हैं और बहनों की चूड़ियां खनकती हैं वह घर सौभाग्यशाली होते हैं। दया भाव और कल्याण भाव से बहुत सुंदर खुशबू निकलती है जिस से तन मन को सकून मिलता है। ये ऐसी खुशबू है जिस से पत्थर दिल आत्मा भी बदल जाती है। सभी योगी विश्व कल्याण के आधार मूर्त हैं। इसलिये हमें सूक्ष्म में अच्छे विचार चारो ओर भेजने हैं। ये विचार तब पैदा होंगे जब हम गहनता से पढ़ेंगे, नहीं तो मोटी बुद्धि रहेंगे और सूक्ष्म विकारों की बदबू फैलती रहेगी। प्रशंसा के विचारों से ऐसी खुशबू निकलती है जिस से हमें उत्साह मिलती है। इसलिये हर व्यक्ति अपनी तरीफ सुनने को लालायित रहता है। भाई भाई के विचार रखने से ऐसी खुशबू निकलती है जिस से सभी हमारी ओर आकर्षित होते हैं। सारा संसार अपना परिवार बन जाता है।

अहिंसा के विचारो से ऐसी खुशबू निकलती है जिस से सांप भी नहीं काटते और शेर जैसे जानवर भी मित्र बन जाते हैं। जिन विचारों से अच्छा अच्छा महसूस हो समझ लो कि उन विचारो से खुशबू पैदा हो रही है। जब हमें लोगो के गुण दिखते हैं तो उस समय विचारों से खुशबु निकलती है। जब कोई हमें अच्छा लगता है उन विचारो से खुशबू निकलती है। जब दूसरो को आगे बढ़ाने के विचार आते हैं, उनके हित की सोचते हैं, उन्हें धनवान बनाने की सोचते हैं, उन्हें निरोगी बनाने का सोचते हैं, नया नया पढ़ने का सोचते हैं, मन में

त्साह होता है तो ऐसे सब विचारों से खुशबू निकलती है। जब योग न लग रहा हो, मन में खुशी नहीं है, पढ़ने को मन नहीं कर रहा हो, काम करने का मन न हो तो समझो मन से बदबू निकल रही है। सदा मन में सात्विक विचार रखो चाहे परिस्थिति कैसी भी हो। एक शब्द बाबा (भगवान) आप प्यार के सागर हैं इसे रिपीट करते रहो इस से ऐसी खुशबू निकलती है जिस से शारीरिक वा मानसिक विघ्न नष्ट हो जाते हैं।

आज्ञा चक्र - २९ -मन-विचारो की दुर्गंध

हमारे बुरे विचारो से दुर्गंध निकलती रहती है। कई लोग कुतो से बहुत डरते हैं और वह चाहे कहीं चले जायें वहां के कुत्ते उनके पीछे लग जाते हैं। जब व्यक्ति डरता है तो डर के कारण उस के विचारो से दुर्गंध निकलती है। वह दुर्गंध ऐसी होती है जैसे कहीं मास का टूकड़ा जलाया जा रहा हो। मास की दुर्गंध कुत्तों को बहुत अच्छी लगती है वह समझते हैं यह उनका शिकार है। इसलिये वह उस व्यक्ति को

(क्रमशः)

**(प्रजापिता ब्रम्हाकुमारी ईश्वरीय विश्व विद्यालय)**

## हसा आणि शतायुषी व्हा!

बायको : अहो, ट्रॅफिक पोलिसाने मला दंड केला लायसन्स नाही म्हणून

नवरा : अगं, पण तुझ्याकडे तर लायसन्स आहे ना

बायको : हो, पण त्यावरचा फोटो चांगला नाही आलाय म्हणून मी नाही दाखवले

## करुया स्पर्धा परिक्षांची तयारी

❋ युद्धातील शौर्य व बलीदान चक्र कोणास जाहीर झाले होते?

– मेजर सोमनाथ शर्मा

– **अरविंद ब्राम्हणे,** भिंगार मो. ९४०३७३४२८१

## आयुर्वेदीय बालसंस्कार

### बौद्धिक विकास कसा करावा?

आपले बाळ हुशार व्हावे, बुद्धिमान असावे, त्याने जीवनात यशस्वी होऊन नावलौकिक मिळवावा, असे प्रत्येक आई-वडीलांना आपल्या बाळाविषयी वाटत असते आणि ते वाटणे काही गैरही नसते. फक्त त्यासाठी विशेष प्रयत्न करण्याची तयारी पालकांनी ठेवली पाहिजे.

प्रत्येक बालकाची बुद्धिमत्ता ही जन्मत: वेगळी असते. काहींना ती उपजतच नैसर्गिक देणगी स्वरुपात जास्त मिळते. तर काहींची बुद्धी ही सर्वसामान्य असते, परंतु विशेष प्रयत्नांनी ती वाढविता येते. बऱ्याच अंशी बालकाला मिळणारी बुद्धी जन्मत: आनुवंशिक गुणांच्या समुच्चयाने मिळालेली असते. त्याशिवाय गर्भधारणेमध्ये गर्भवतीच्या शारीरिक व मानसिक आरोग्याची व्यवस्थित काळजी घेऊन गर्भाची वाढ प्राकृत होण्यावरसुद्धा बुद्धिमत्ता अवलंबून असते. गर्भधारणेच्या काळात गर्भवती मातेवर विशेष संस्कार करुन तिच्या आहार-विहाराकडे व्यवस्थित लक्ष देऊन बुद्धिमत्ता वाढविता येते, हे आता सिद्ध झाले आहे. त्यामुळे आनुवंशिकतेने मिळणाऱ्या बुद्धिमत्तेसोबत आपण विशेष प्रयत्न करायला हवेत. गर्भधारणेपासून बालक सहा वर्षांचे होईपर्यंत त्याच्या मेंदूचा विकास अतिशय वेगाने होत असतो.

त्यातही पहिल्या तीन वर्षांपर्यंत मेंदूची बहुतेक सर्व वाढ पूर्ण झालेली असते. म्हणून या काळात जास्त कष्ट न घेताही बाळाचा बौद्धिक विकास करता येतो. त्यानंतरच्या पुढील तीन वर्षांच्या काळात, म्हणजेच वय वर्षे सहापर्यंत विशेष प्रयत्न करुन बाळावर वारंवार संस्कार करुन बुद्धिमत्ता वाढविता येते. परंतु सर्वसामान्यांचे म्हणणे असते, की आताच कशाला बाळाला शिकवायचे? शाळेत गेल्यानंतर त्याला शिकायचेच आह. हे वय त्याचे खेळायचे आहे. आताच त्याच्या मेंदूला कशाला ताण द्यायचा. परंतु बालक जन्म झालेल्या क्षणापासून वेगवेगळ्या गोष्टी शिकण्यासाठी उत्सुक सते. त्याची थकणार नाही. असतो. एकूणच यावर्षे ही जास्त शिकण्याची क्षमता आपण शिकविण्याच्या क्षमतेपेक्षा खूप असते. आपण घरातील सदस्या प्रत्येकाने जरी शिकविण्याचा प्रयत्न केला, तरी आपण थकून जाऊ; परंतु बाळ ज्ञान ग्रहण कधीही थकणार नाही. म्हणून पहिल्या सहा वर्षांचा काळ हा त्याच्या भावी आयुष्याच रचण्यासाठी अत्यंत महत्त्वाचा असतो.

**(क्रमशः)**

**डॉ. शारदा निर्मळ-महांडुळे**
दुर्वांकुर वंध्यत्व निवारण व गर्भसंस्कार सेंटर
अहिल्यानगर
मोबाईल नं- ८७९३४००४००

# पंढरपूरच्या श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिर समितीला संदीप उद्योग समूहाकडून इलेक्ट्रिक वाहनाची भेट

## वृद्ध, दिव्यांग आणि महिलांसाठी उपयोगी सेवा; भानुदास कोतकर यांच्या हस्ते मंदिर समितीकडे वाहन सुपूर्द


संदीप उद्योग समूहाच्यावतीने पंढरपूरच्या श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिर समितीला भानुदास कोतकर यांच्या हस्ते वाहन इलेक्ट्रिक वाहन भेट देण्यात आले.

नगर – आषाढी वारीच्या पावन पर्वानिमित्त भाविकांच्या सोयीसाठी संदीप उद्योग समूहाच्या वतीने श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिर समितीला (पंढरपूर) एक अत्याधुनिक इलेक्ट्रिक वाहन भेट देण्यात आले. वारीत दर्शनासाठी आलेल्या वृद्ध, दिव्यांग, अपंग, लहान मुले आणि महिलांसाठी हे इलेक्ट्रिक वाहन उपयुक्त ठरणार आहे.

हे वाहन संदीप उद्योग समूहाचे संस्थापक भानुदास कोतकर यांच्या हस्ते मंदिर समितीकडे सुपूर्द करण्यात आले. यावेळी माजी महापौर संदीप कोतकर, उपमहापौर सुवर्णाताई कोतकर, कृषी उत्पन्न बाजार समितीच्या संचालिका सुप्रियाताई कोतकर, उद्योजक अमोल कोतकर, देवस्थानचे कार्यकारी अधिकारी राजेंद्र शेळके, पंढरपूर नगराध्यक्ष लक्ष्मण शिरसाठ, देवस्थानचे व्यवस्थापक मनोज श्रोत्री, नगरसेवक विक्रम शिरसाठ आदी उपस्थित होते.

भानुदास कोतकर म्हणाले की, वारी म्हणजे भक्ती, समर्पण आणि सेवा यांचे प्रतीक आहे. या वारीत हजारो वारकरी व भाविक सहभागी होतात. त्यामध्ये वृद्ध, दिव्यांग, अपंग, लहान मुले व महिलांची मोठी संख्या असते. त्यांना मंदिराच्या परिसरात सुरक्षित आणि आरामदायक वाहतुकीसाठी इलेक्ट्रिक वाहन अत्यंत उपयुक्त ठरेल. सेवा हीच खरी पूजा आहे, या भावनेतून आम्ही हा उपक्रम राबवला असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. देवस्थानचे कार्यकारी अधिकारी राजेंद्र शेळके यांनी संदीप उद्योग समूहाने दिलेले हे इलेक्ट्रिक वाहन भाविकांसाठी अतिशय उपयुक्त ठरणार असल्याचे सांगून या उपक्रमाचे कौतुक करुन आभार व्यक्त केले.

# इव्हेंट मॅनेजमेंट सर्टिफिकेट कोर्ससाठी 'आयएमएस'मध्ये प्रवेश प्रक्रिया सुरु

## ९ व १३ जुलै रोजी मोफत मार्गदर्शन सेमिनार

नगर – लहान बाळाच्या बारशापासून लग्न समारंभ, कॉर्पोरेट कार्यक्रम, वाढदिवस अशा कितीतरी कार्यक्रमांसाठी सध्या इव्हेंट मॅनेजमेंट हा परवलीचा शब्द बनला आहे. या क्षेत्रात स्वत:चा व्यवसाय करण्याच्या तसेच करियर करण्याच्या अनेक चांगल्या संधी उपलब्ध आहेत. त्यादृष्टीने नगरमध्ये इव्हेंट मॅनेजमेंटचे परिपूर्ण शिक्षण मिळावे यासाठी आयएमएस संस्थेत सर्टिफिकेट कोर्स इन इव्हेंट मॅनेजमेंट घेण्यात येत आहे. या कोर्ससाठी प्रवेश प्रक्रिया सुरु झाली आहे. या कोर्सची ओळख करून देण्यासाठी ९ व १३ जुलै रोजी सकाळी ११.३० वा. मोफत मार्गदर्शन वर्ग आयोजित करण्यात आले आहे, अशी माहिती संस्थेचे संचालक डॉ.एम.बी.मेहता यांनी दिली.

कोर्सच्या समन्वयक श्रद्धा गांधी यांनी सांगितले की, सर्टीफिकेट कोर्स इन इव्हेंट मॅनेजमेंट हा ५ महिन्यांचा कोर्स आहे. दहावी उत्तीर्ण झालेली कोणतीही व्यक्ती, विद्यार्थी, गृहिणीही हा कोर्स करू शकतात. यात थेअरी, प्रॅक्टिकल आणि तज्ज्ञांची व्याख्याने यांचा समावेश आहे. आठवड्यातून तीन दिवस प्रशिक्षण दिले जाणार आहे. आतापर्यंत संस्थेत हा कोर्स करणाऱ्या अनेकांनी स्वत:चा इव्हेंट मॅनेजमेंटचा व्यवसाय सुरु केला आहे. काही जणांना चांगल्या कंपनीत नोकरीही मिळाली आहे. हा कोर्स केल्यानंतर चांगली नोकरी मिळू शकते, क्रिएटिव्ह मॅनेजमेंट करता येवू शकते तसेच कन्सलटंट म्हणूनही चांगल्या संधी मिळू शकतात. सध्या अनेक जण आपल्या कार्यक्रमासाठी चांगल्या इव्हेंट मॅनेजमेंटच्या शोधात असतात. अनेक कॉर्पोरेट कंपन्यांचेही वेगवेगळे इव्हेंट आयोजित करता येवू शकतात. त्यामुळे याचे योग्य शिक्षण व प्रशिक्षण आवश्यक असते. आयएमएसने तज्ज्ञांच्या सल्ल्याने अतिशय उपयुक्त कोर्स तयार केला आहे.

कोर्समध्ये प्रॅक्टिकल व थेअरीचा समावेश आहे. बेसिक इव्हेंट कन्सेप्ट, इव्हेंट प्लानिंग टूल्स, इव्हेंट मार्केटिंग, इव्हेंट बजेट कसे तयार करावे, वेडिंग प्लानिंग आदी विषयांचे ज्ञान दिले जाते. कोर्सची माहिती व प्रवेश प्रक्रियेसाठी संपर्क : ९४२२०८१०९७.


सिद्धी पॅरामेडिकल येथे करिअर सेमिनारचे यशस्वी आयोजन करण्यात आले आहे.

# सिद्धी पॅरामेडिकल येथे करिअर सेमिनारचे यशस्वी आयोजन

नगर – महाराष्ट्र शासन मान्यताप्राप्त सिद्धी पॅरामेडिकल इन्स्टिट्युट श्रीरामपूर येथे लवकरच होणाऱ्या आरोग्य विभागाची मोठी भरतीमध्ये विद्यार्थ्यांना असणारी संधी तसेच महाराष्ट्र पॅरामेडिकल कौन्सिल रजिस्ट्रेशन प्रक्रिया व इंटरव्यू स्किल्स व पर्सनॅलिटी डेव्हलपमेंट या विषयावर मार्गदर्शनपर सेमिनारचे आयोजन करण्यात आले होते. आरोग्य विभागाची भरती व स्पर्धा परीक्षेची तयारी यावर अण्णासाहेब तमनर यांनी विचार मांडले.

सिद्धी पॅरामेडिकलचे भरपूर विद्यार्थी आरोग्य सेवेत रुजू आहेत आणि भविष्यातही अनेक विद्यार्थी रुजू होतील असे प्रतिपादन दत्तात्रय मिसाळ यांनी केले.

सतीश शेळके यांनी महाराष्ट्र पॅरामेडिकल कौन्सिल रजिस्ट्रेशन प्रक्रिया कशी करावी व अधिकृत टेक्निशियन म्हणजे काय यावर विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

कमलेश कोते यांनी इंटरव्यू स्किल्स व पर्सनॅलिटी डेव्हलपमेंट या विषयावर प्रात्यक्षिक दाखवून त्याचे महत्त्व पटवून दिले.

विद्यार्थ्यांना सिद्धी लुंकड यांच्या हस्ते प्रशस्तीपत्रक देण्यात आले. सूत्रसंचालन महेश जोशी व सारिका घोडके यांनी केले.

डॉ. हरीष लुंकड यांनी आभार मानले. सदर कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी सिद्धी पॅरामेडिकल इन्स्टिट्युटच्या प्राजक्ता जाधव, कांचन भगत, मयुरी बागुल, वैष्णवी कोतकर, दिलीप गालफाडे, समीर शहा, शुभम खरात आदींनी अथक परिश्रम घेतले.

# बालगृहातील विद्यार्थ्यांना अन्न-धान्य व किराणा साहित्याची भेट

## समर्पण सेवा संस्थेतील महिलांचा उपक्रम; गरजू विद्यार्थ्यांना शिक्षणाला प्रोत्साहन देण्यासाठी संस्थेचा सातत्यपूर्ण प्रयत्न



समर्पण सेवा संस्थेच्या महिलांनी चंद्रभान आठरे पाटील ग्राम नवोदय ट्रस्ट संचलित बालगृहातील विद्यार्थ्यांना अन्न-धान्य व किराणा साहित्याची भेट दिली.

नगर – समाजातील उपेक्षित, निराधार आणि गरजू विद्यार्थ्यांसाठी सामाजिक भान ठेवून कार्यरत असलेल्या समर्पण सेवा संस्थेच्या महिलांनी चंद्रभान आठरे पाटील ग्राम नवोदय ट्रस्ट संचलित बालगृहातील विद्यार्थ्यांना अन्न-धान्य व किराणा साहित्याची भेट दिली. या उपक्रमाअंतर्गत मुलांच्या चेहऱ्यावर आनंद फुलवणारे मनोरंजनात्मक खेळ व सांस्कृतिक कार्यक्रम घेण्यात आला.

समर्पण सेवा संस्थेच्या महिलांनी बालगृहातील मुलांसोबत वेळ घालवत त्यांच्यासह कार्यक्रमाचा आनंद लुटला. चिमुकल्यांसाठी हा कार्यक्रम एक आनंदाची पर्वणी ठरली. शिक्षणासाठी प्रोत्साहन देण्याच्या उद्देशाने संस्थेच्या माध्यमातून शैक्षणिक साहित्य वाटप, मार्गदर्शन सत्रे, तसेच सामाजिक बांधिलकी जपणारे अनेक उपक्रम राबवले जात आहेत. त्याचा एक भाग म्हणून या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

या उपक्रमाच्या निमित्ताने संस्थेच्या अध्यक्षा रूपा पंजाबी, सुनिता साहनी, शशी आनंद, सुमन साहनी, कोमल साहनी, वर्षा तलवार, हेमा बस्सी, वसंतकौर वधवा, मंजू अरोरा, संगीता जग्गी, रेखा पावा, किरण खोसला, पुनम खुल्लर, राजेंद्र जग्गी, भाग्यरेखा, सोनिया कुंद्रा आदी उपस्थित होते.

रूपा पंजाबी म्हणाल्या की, जीवनात यश प्राप्त करण्यासाठी कोणावरही विसंबून राहू नये. जीवनात आपले अस्तित्व निर्माण करावे. शिक्षण घेऊन मोठे व्हावे. तर स्वतः यशस्वी झाल्यावर इतरांना देखील मदतीचा हात देऊन, इतरांचे जीवन प्रकाशमय करण्याचे त्यांनी सांगितले. तर उपेक्षित घटकातील विद्यार्थ्यांना शिक्षणासाठी संस्थेच्या माध्यमातून सातत्याने सहकार्य करुन प्रोत्साहन दिले जात असल्याचे त्यांनी सांगितले.

बालगृहाचे अध्यक्ष डॉ. अनिल आठरे यांनी महिलांनी पुढाकार घेऊन राबविलेल्या या उपक्रमाचे कौतुक केले. बालगृहाच्या अधीक्षिका पुष्पांजली थोरात यांनी समर्पण सेवा संस्थेचे आभार मानले. कार्यक्रमाच्या अखेरीस विद्यार्थ्यांना अल्पोपहाराचे वाटप करण्यात आले.

# शहिद अब्दुल हमीद यांचे बलिदान सकारात्मक योगदान देण्याची प्रेरणा देते

## हाजी आलम खान यांचे प्रतिपादन; जयंतीनिमित्त मखदुम सोसायटी तर्फे मोफत वह्या वाटप



मख़दुम एज्युकेशन ॲण्ड वेल्फेअर सोसायटी व रहमत सुलतान फाउंडेशनच्यावतीने स्वतंत्रता सेनानी शहीद अब्दुल हमीद यांच्या जयंतीनिमित्त जिल्हा परिषद शाळा फकीरवाडा येथे मोफत वहया वाटप मरहुमा हज्जन शमीम सैफअली यांच्या कुटुंबीयांच्या सहकार्याने करण्यात आले.

नगर – शहीद अब्दुल हमीद यांचे जीवन आपल्याला शिकवते की, देशप्रेम ही फक्त भावना नाही ती कृती आहे. आज आपण जरी शस्त्र हातात घेत नाही, पण आपले शस्त्र म्हणजे शिक्षण, प्रामाणिकपणा, आणि कर्तव्यभावना आहे. अब्दुल हमीद यांचं बलिदान हेच आपल्याला प्रेरणा देतं की आपणही आपल्या कर्तव्यात प्रामाणिक राहावे, आणि देशासाठी काहीतरी सकारात्मक योगदान द्यावं. शहीद अब्दुल हमीद यांना त्यांच्या शौर्याबद्दल भारताच्या सर्वोच्च लष्करी सन्मान परमवीर चक्र मरणोत्तर सन्मानित करण्यात आले. हे भारतातील सर्वात प्रतिष्ठेचे वीरता पदक आहे. हे पदक मिळवणारे ते पहिले मुस्लिम जवान होते.त्यांचे नाव आजही भारतीय लष्करात, आणि प्रत्येक देशभक्ताच्या मनात, अत्यंत सन्मानाने घेतले जाते, असे प्रतिपादन शफी हज उमरा टुर्सचे संस्थापक हाजी आलम खान यांनी केले.

मख़दुम एज्युकेशन ॲण्ड वेल्फेअर सोसायटी व रहमत सुलतान फाउंडेशनच्यावतीने स्वतंत्रता सेनानी शहीद अब्दुल हमीद यांच्या जयंतीनिमित्त जिल्हा परिषद शाळा फकीरवाडा येथे मोफत वहया वाटप मरहुमा हज्जन शमीम सैफअली यांच्या कुटुंबीयांच्या सहकार्याने करण्यात आले. याप्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून हाजी आलम खान, मुस्कान वेल्फेअर असोसिएशनचे अध्यक्ष शफकत सय्यद, अलनुर आय केयर सेंटर चे तनवीर चष्मावाला, मखदुम सोसायटीचे अध्यक्ष आबीद दूल्हेखान, शेख दिलशाद मुसा, पठाण सुमय्या मोहसीन, मुख्यमंत्री युवा प्रशिक्षणार्थी बुशरा बाजी आदी उपस्थित होते.

आलम खान म्हणाले, वह्या वाटप केवळ शिक्षणसाहित्याचे वाटप नाही, तर हा एक संदेश आहे. शिक्षण, समता आणि सामाजिक जबाबदारीचा, या कृतीतून आपण आपल्या पुढच्या पिढीला शिकण्याची प्रेरणा देत आहोत. शिकणे हीच खरी शक्ती आहे! तुम्ही शिकाल, घडाल आणि समाजाचे उज्वल भविष्य घडवाल अशी अपेक्षा व्यक्त केली.

सूत्रसंचालन आबीद दुलेखान यांनी केले. तनवीर चष्मावाला यांनी आभार मानले.

# जर्मनीतील आंतरराष्ट्रीय फिल्म फेस्टिवलमध्ये अहिल्यानगरचा अभिनेता प्रशांत नेटके पाटील यांची भूमिका असलेला चित्रपट





नगर – जगभरातील १९४ देशांमधून आलेल्या हजारो चित्रपटांमधून केवळ तीन भारतीय चित्रपटांची निवड झाली असून, त्यातील 'अबीर' हा एकमेव मराठी चित्रपट आहे. ऑस्कर आणि कान्सनंतर जर्मनीतील हा चित्रपट महोत्सव जगभरात मानाचा समजला जातो.

शंभु एन्टरटेन्मेन्टचा पहिला मराठी चित्रपट 'अबीर'ने जर्मन आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवात वाजवला डंका! सुदेश झावरे पाटील निर्मित आणि आकाश शिंदे दिग्दर्शित 'अबीर' या चित्रपटाने जर्मनीतील २२व्या इंडियन फिल्म फेस्टिवलमध्ये आपली छाप पाडली आहे.

विशेष म्हणजे यात चित्रपटात, प्रशांत नेटके पाटील यांची भूमिका मुलीचा मामा असुन मामीची भुमिका निळू फुले यांची कन्या गार्गी फुले यांनी केली आहे. तसेच देवकी दफ्तरदार, पायल जाधव, गार्गी फुले, प्रशांत नेटके पाटील, यश डिम्बले, गणेश देशमुख, निखील चव्हाण यांच्या प्रमुख भुमीका असुन, अहिल्यानगर येथील बऱ्याच कलाकारांचा सहभाग आहे. तसेच पारनेरचे सुजित झावरे पाटील यांनी या चित्रपटात पाहुणा कलाकार दमदार भूमिका केलेली आहे.



# जैन वात्सल्य संस्थेच्यावतीने जीवनावश्यक किराणा किट वितरण

जैन वात्सल्य संस्थेच्यावतीने जीवनावश्यक किराणा किट वितरणाचा उपक्रम प्रमुख पाहुणे ललित गुंदेचा यांच्या हस्ते झाला. यात गहू, तांदूळ, डाळी, साखर, चहा, तेल, मीठ, मसाले, साबण अशा जीवनावश्यक वस्तूंचा समावेश असलेल्या सुमारे ₹१२०० मूल्याच्या किट्स वितरित करण्यात आल्या. यामुळे अनेक कुटुंबांना महिनाभराचा आधार मिळाला. या कार्यक्रमात संस्थेचे अध्यक्ष अजित बोरा, उपाध्यक्ष सुभाष मुथा, खजिनदार सतीश मुथा, संचालक सचिन चोपडा, मुळचंद डागा, विजय गुंदेचा, ईश्वर बोरा, सचिव विजय गुगळे, अशोक कोठारी आदी उपस्थित होते.

# रांजणी ते मोहटा देवी महिला पायी रथ दिंडी सोहळ्याचे ९ जुलैपासून आयोजन

नगर – सालाबाद प्रमाणे रांजणी ता. नगर येथील स्व. ॲड. प्रभाकर भानुदास गोरे (मामा) यांच्या प्रेरणेने रांजणी ते मोहटा देवी पायी दिंडी सोहळा ९ ते १० जुलै रोजी आयोजित करण्यात आलेली आहे.

सोहळ्याच्या परंपरेला ३२ वर्ष पुर्ण होत असून चालु वर्ष हे ३३ वे वर्ष आहे. त्यानिमित्त गोरे परिवार व मोहटादेवी भक्तगण यांनी रथ पायी महिला दिंडीचे आयोजन केलेले असुन हा रथ म्हणजे महाराष्ट्रातील पहिली मोहटा देवी रथ पायी दिंडी सोहळा आहे. ही दिंडी म्हणजे महिलांचे शिस्तप्रिय दिंडी अशी ओळखले जाते. या दिंडीचे वैशिष्ट्य म्हणजे कुठल्याही भक्तगणांकडून शुल्क आकारले जात नाही. सदर दिंडीत परिसरातील अनेक मोहटा देवीचे भक्तगण व गावगावचे आरादी मंडळी या सोहळ्यात भक्तीभावाने सहभागी होतात. दर वर्षी सहभागी मोहटा देवी भक्तगणांची संख्या वाढतच आहे. तसेच राजू देवा तुंगार यांचे संकल्पनेतुन दिंडीला सुरूवात झालेली आहे.

कै. ॲड. प्रभाकर भानुदास गोरे (मामा) यांच्या शेतामध्ये रेणूका मातेचे मंदिर असुन जागृत देवस्थान म्हणून परिसरातील लोक भक्तीभावाने हा सोहळा साजरा करतात. तेथूनच दिंडीचे प्रस्थान होते. दिंडीचे व देवीचे पालखी व रथाचे गाव गाव भक्ती भवाने स्वागत होते. तसेच कानीफनाथ देवस्थान मढी व मोहटा देवी देवस्थानच्यावतीने दिंडीचे व देवीचे पालखी व रथाचे स्वागत होवुन महाप्रसादचे आयोजन केले जाते.

वरील दिंडी सोहळ्यात मोहटादेवी भक्तगणांनी सहभागी होवून आनंद यात्रेचा लाभ घ्यावा, असे आवाहन श्रीमती प्रयागा प्रभाकर गोरे, ॲड. रणजीत प्रभाकर गोरे व रांजणी ग्रामस्थ आरादी मंडळ, महिला मंडळ आदींनी केले आहे.

# आपला देह ही एक बासरी आहे त्याद्वारे स्वतः ला आपले स्वर लावता आले पाहिजेत

## प्रा. डॉ. शरद कोलते यांचे प्रतिपादन; गुरूमाऊली संगीत विद्यालयाचा वार्षिक 'सन्मार्गम्' कलाविष्कार उत्साहात


श्री गुरूमाऊली संगीत विद्यालयाच्या वार्षिक महोत्सवा विद्यार्थिनींनी भरतनाट्यम मधील 'सन्मार्गम्' हा अनोखा कलाविष्कार सादर केला. यावेळी डॉ. शरद कोलते, ह.भ.प गोरक्षनाथ दुतारे महाराज, डॉ. सी. बी. कुलकर्णी, डॉ. गौरी कुलकर्णी, कमलेश भंडारी, डॉ.स्मिता कवाद आणि डॉ. रुपाली मगर, धनेश बोगावत, अशोक गांधी, वर्षा पंडित व चंद्रकांत पंडित आदी.

नगर – प्रत्येक व्यक्तीत उपजतच अंतर्गत ऊर्जा असते, ती प्रत्येकाने ओळखत समजून घेत तिचा योग्यवेळी व योग्य ठिकाणी वापर केल्यास सहज यश प्राप्त होते. आपला देह ही एक बासरी आहे, त्याद्वारे स्वतः ला आपले स्वर लावता आले पाहिजेत. गुरूमाऊली संगीत विद्यालयाच्या विद्यार्थिनी भरतनाट्यममध्ये पारंगत होत सन्मार्गम् हा कलाविष्कारात उत्कृष्टपणे सादर केला आहे. यासाठी मार्गदर्शक वर्षा पंडित यांचे समर्पित भावनेचे कौतुक करतो, असे प्रतिपादन शिक्षणतज्ज्ञ डॉ. शरद कोलते यांनी केले.

अहिल्यानगरच्या श्री गुरूमाऊली संगीत विद्यालयाच्या वार्षिक महोत्सवा अंतर्गत भरतनाट्यम या शास्त्रीय नृत्यप्रकारातील 'सन्मार्गम्' या अनोख्या कलाविष्काराचे उत्कृष्ट सादरीकरण झाले. अहिल्यानगरच्या माऊली सभागृह येथे झालेल्या या कार्यक्रमाच्या अध्यक्षपदी डॉ. शरद कोलते होते. यावेळी रामायणाचार्य ह.भ.प गोरक्षनाथ दुतारे महाराज, चिंतामणी हॉस्पिटलचे डॉ. सी. बी. कुलकर्णी, डॉ. गौरी कुलकर्णी, भारत भारतीचे पश्चिम प्रांतचे उपाध्यक्ष कमलेश भंडारी, शिरूरचे डॉ. स्मिता कवाद आणि डॉ. रुपाली मगर, उद्योजक धनेश बोगावत, अशोक गांधी, गुरूमाऊली संगीत विद्यालयाच्या मार्गदर्शिका वर्षा पंडित, चंद्रकांत पंडित उपस्थित होते.

नृत्याच्या कार्यक्रमात भरतनाट्यम मार्गम्मधील विविध पारंपरिक रचना सादर केल्या गेल्या. त्यात वर्षा चंद्रकांत पंडित यांच्यासह विद्यालयाच्या सर्व शाखांच्या ९५ विद्यार्थीनींनी भरतनाट्यम मधील सुरुवातीचे 'अडवू' पासून ते 'तिल्लाना व मंगलम' पर्यंतचा संपूर्ण प्रवास सन्मार्गम् या शीर्षकाला साजेसा असा नृत्याविष्कार उत्कृष्टपणे गुंफला गेला. सादर केलेल्या भरतनाट्यम मार्गम् मधील पारंपरिक रचनांमध्ये पुष्पांजली, अलारिपु, जतीस्वरम्, शब्दम्, कीर्तनम, पदम, वर्णम, मधूराष्टकम् व शेवटी तिल्लाना व मंगलम या भरतनाट्यमच्या रचना क्रमाने सादर केल्या.

डॉ. सौ. रुपाली मगर यांनी वर्षा पंडित यांच्या कार्याचे कौतुक करत त्या अहिल्यानगर येथून शिरूरला येऊन मुलींना भरतनाट्यम त्या अतिशय तन्मयतेने शिकवत असल्याचे सांगितले.

कमलेश भंडारी म्हणाले, वर्षा पंडित यांच्या मागे त्यांचे पती चंद्रकांत पंडित खंबीरपणे उभे राहून मार्गदर्शन करत आहेत.

सादर झालेल्या सर्व नृत्याविष्कारांना रसिक प्रेक्षकांनी उत्स्फूर्त दाद दिली. संचालिका वर्षा पंडित यांनी सर्व उपस्थितांचे व पालकांचे आभार मानले.

या कार्यक्रमाचे निवेदन वर्षा पाठक यांनी केले. दिनेश मंजतरकर यांनी रेखाटलेल्या सुरेख रांगोळीने सर्वांचे लक्ष वेधून घेतले.

यावेळी भरतनाट्यम नृत्य गुरू मंजुषा देशमुख, विलास बडवे, मकरंद खरवंडीकर, डॉ. धनश्री खरवंडीकर, माधवी ऋषी, अशोक मवाळ, कृष्णा वखारे, प्रा. शरद गोखले आदी उपस्थित होते.

# इनरव्हील क्लब ऑफ अहिल्यानगरच्या अध्यक्षपदी मधुबाला चोरडिया तर सेक्रेटरीपदी सुजाता कटारिया

नगर – इनरव्हील क्लब ऑफ अहिल्यानगरचा ३२ वा पदग्रहण समारंभ उत्साहात पार पडला. मावळत्या अध्यक्षा उज्वला भंडारी यांनी मधुबाला चोरडिया यांना अध्यक्षपदाची सूत्रे सोपविण्यात आली. तर क्लबच्या वतीने १५१ वृक्षारोपण करून सामाजिक उपक्रमाची सुरवात करण्यात आली.


इनरव्हील क्लब ऑफ अहिल्यानगरचा ३२ वा पदग्रहण समारंभ उत्साहात पार पडला.

कार्यक्रमाच्या प्रमुख पाहुण्या म्हणून हायजिन फर्स्टच्या संचालिका वैशाली गांधी होत्या. गांधी म्हणाल्या की, ग्रुपच्या माध्यमातून महिला जे काम करत आहेत ते खूप मोठे कार्य आहे. आपला संसारा सोबत महिलांनी एक विचार हाती घेतला आहे. तसेच नुतन अध्यक्षा मधुबाला चोरडिया या सर्व गृहिणीसाठी आदर्श आहेत. जेव्हा एखादी स्त्री आपला व्यवसाय, घर व सामाजिक कार्य चांगल्या पद्धतीने सांभाळते. त्या स्त्रीला वेगळ्या ब्युटीपार्लरची गरज नसते. कारण हे काम करताना जो ग्लो, कॉन्फिडन्स येतो. तो त्यांच्या कामाच्या उत्साहातून येतो, असे सांगून त्यांनी नवनिर्वाचित सर्व पदाधिकाऱ्यांना शुभेच्छा दिल्या.

मधुबाला चोरडिया यांनी इनरव्हील क्लब ऑफ अहिल्यानगर ही एक महिलांसाठी असलेली आंतरराष्ट्रीय स्तरावरील सेवाभावी संस्था आहे. या संस्थेचे मुख्य उद्दिष्ट महिला आणि बालकांच्या कल्याणासाठी काम करणे, तसेच समाजाच्या विकासासाठी विविध उपक्रम राबवणे आहे. लवकरच क्लबच्या मध्यमातून आरोग्य शिबिरे, शैक्षणिक कार्यक्रम, आणि गरजू लोकांसाठी मदतकार्य आयोजित केले जाणार असल्याचे सांगितले. तर येणाऱ्या काळात राबविण्यात येणाऱ्या सामाजिक उपक्रमाची माहिती दिली व संघटनेची धोरण त्यांनी स्पष्ट केले.

यावेळी पिडीसी सायली खानदेशे, सेक्रेटरी सुजाता कटारिया, खजिनदार डॉ. नीलम बागल, आयएसओ नूतन चोरडिया, लक्ष्मी काळे, उपाध्यक्षा प्रभा खंडेलवाल, प्रोजेक्ट कोऑर्डिनेटर कांता चंगेडिया, मंगल मुथा, रेशमा चारनीया, कल्पना मुथा, मनीषा झीने, गायत्री पित्रोडा आदी उपस्थित होते.

याप्रसंगी ३१३ इनरव्हीलचे सर्व मेंबर, रोटरीचे अध्यक्ष सुनील कटारिया, रोटरीचे माजी अध्यक्ष नरेंद्र चोरडिया, ललित कर्नावट यांचा सत्कार करण्यात आला. नवीन आलेल्या सदस्यांना पिडीसी सायली खानदेशे यांनी इनरव्हीलची माहिती सांगून शपथ दिली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन हेमा निसळ व लक्ष्मी काळे यांनी केले. उपाध्यक्षा प्रभा खंडेलवाल यांनी आभार मानले.

# डॉ. दर्शनप्रभाजी म.सा., डॉ.अनुपमाजी म.सा. यांचा ६ जुलैला आनंदधाम येथे चातुर्मासनिमित्त मंगलप्रवेश





नगर – जैन धर्मातील पवित्र चातुर्मास पर्वानिमित्त वात्सल्यमूर्ती शासन प्रभाविका साध्वी डॉ. दर्शनप्रभाजी म.सा., डॉ.अनुपमाजी म.सा. आदि ठाणा ८ यांचा ६ जुलै रोजी आनंदधामच्या पवित्र प्रांगणात मंगल प्रवेश होणार आहे. यादिवशी सकाळी सकाळी ८.१५ वाजता सारसनगर जैन स्थानक येथून साध्वीजींची स्वागत शोभायात्रा निघणार आहे. तब्बल १० वर्षानंतर डॉ.दर्शनप्रभाजी म.सा.यांचा चातुर्मास आनंदधाम येथे होत असून भाविकांसाठी ही धार्मिक पर्वणी आहे. चातुर्मास पर्व १० जुलैपासून सुरु होणार आहे, अशी माहिती जैन श्रावक संघाचे अध्यक्ष हस्तीमल मुनोत यांनी दिली.

आचार्यश्रींच्या पवित्र भूमीत आनंदधाम येथे डॉ.दर्शनप्रभाजी म.सा., डॉ. अनुपमाजी म.सा., विरतीसाधनाजी म.सा., विरागसाधनाजी म.सा., स्वयंसाधनाजी म..सा., श्रुतसाधनाजी म.सा., डॉ.लक्षितसाधनाजी म.सा., जिनेश्वराजी म.सा. यांचा मंगलप्रवेश होणार आहे. सारसनगर जैन स्थानकापासून स्वागत शोभायात्रा निघणार आहे.

यावेळी महाराष्ट्र प्रवर्तक कुंदनऋषीजी म.सा. यांची उपस्थिती राहणार आहे. यात महिला भाविक डोक्यावर मंगल कलश घेवून तर पुरुष भाविक पांढरे पेहराव परिधान करून सहभागी होतील. लहान मुलेही तितक्याच उत्साहात साध्वीजींचे स्वागत करणार आहेत. सकाळी ९.१५ वाजता सर्वांचे आनंदधाम येथे आगमन होईल. कार्यक्रमानंतर गौतम प्रसादीची व्यवस्था करण्यात आली आहे. नगरमधील श्रावक श्राविकांनी या मंगल प्रवेश सोहळ्यास उपस्थित रहावे असे आवाहन श्री वर्धमान स्थानकवासी जैन श्रावक संघाचे सेक्रेटरी संतोष बोथरा व सर्व पदाधिकाऱ्यांनी केले आहे.

# डॉ. सुधा कांकरिया लिखित ‘हृदय आरोग्याच्या गप्पागोष्टी’ पुस्तकाचे १३ जुलैला प्रकाशन

**मुंबईचे हृदयरोगतज्ज्ञ डॉ. रतन राठोड यांचे व्याख्यान**




नगर – सध्याच्या धावपळीच्या तणावयुक्त जीवनात हृदयरोगाचे प्रमाण वाढत चालले आहे आणि मुख्यत: तरूणपिढीलाही ते ग्रासून टाकत आहे. हार्ट अटॅकमुळे होणाऱ्या मृत्यूची संख्या वाढत आहे. हे चित्र नक्कीच चिंतादायक आहे परंतू आनंदाची बाब म्हणजे आपण हे सर्व टाळू शकतो एका आरोग्यसंपन्न जीवनशैलीव्दारे आणि याच जीवनशैलीवर आधारित डॉ. सुधा कांकरिया लिखित ‘हृदय आरोग्याच्या गप्पागोष्टी’ हे पुस्तक आहे. सदर पुस्तकाचे व ऑडिओ बुकचे प्रकाशन तसेच मुंबई येथील हृदयरोगतज्ज्ञ एम.जी.एम. मेडिकल कॉलेजच्या कार्डियाक डिपार्टमेंटचे हेड आणि संशोधक डॉ. रतन राठोड यांचे याच विषयावर मार्गदर्शनपर व्याख्यान आयोजित केले आहे, अशी माहिती डॉ. प्रकाश कांकरिया यांनी दिली. सदर पुस्तकास आरोग्यमंत्री प्रकाश आबिटकर, महाराष्ट्र राज्याचे आय एम ए चे अध्यक्ष डॉ. संतोष कदम, हार्ट ट्रान्सप्लांट सर्जन मुंबई डॉ. अन्वय मुळे यांनी पाठविलेल्या शुभसंदेशामध्ये साध्या, सोप्या, सहज भाषेतील समाजउपयोगी पुस्तक आहे असे म्हटले आहे.

सदर समारंभ मानकन्हैय्या ट्रस्ट आणि जैन सोशल फेडरेशनचे आनंदऋषिजी हॉस्पिटलच्या वतीने आयोजित करण्यात आले आहे. १३ जुलै सकाळी १०.३० वाजता अहिल्यानगर येथील स्टेशन रोड वरील सहकार सभागृह येथे याचे आयोजन केले आहे. कार्यक्रमाचे अध्यक्ष सभापती प्रा. राम शिंदे, तर प्रमुख पाहुणे आमदार संग्राम जगताप, पद्मश्री पोपटराव पवार, कार्डिओलॉजीस्ट डॉ. बापूसाहेब कांडेकर, विखे पा. मेडिकल कॉलेज डिन डॉ. सुनिल म्हस्के, ब्रह्माकुमारीज् संचालिका बी के राजराजेश्वरी हे आहेत अशी माहिती डॉ. वसंत कटारीया यांनी दिली.

याच समारंभात हृदय आरोग्य क्षेत्रात केलेल्या सेवाभावी कार्याबद्दल डॉ. रतन राठोड यांना हृदयरत्न अवॉर्ड दिला जाणार आहे असे डॉ. सुधा कांकरिया यांनी सांगितले. तसेच सदर कार्यक्रमास नागरीकांनी सहभागी व्हावे असे आवाहन ही केले. कार्यक्रम मोफत असुन प्रवेशिका घेणे मात्र आवश्यक आहे. प्रवेशिकासाठी साई सूर्य नेत्रसेवा, माणिक चौक, अहिल्यानगर येथे ९८५०८८७८३८.

# विठोबा माऊली...ज्ञानराज माऊली तुकाराम... जयघोषात केडगावमध्ये रंगला दिंडी सोहळा

नगर – केडगावमध्ये ज्ञानसाधना एज्युकेशन फाउंडेशन संचलित लंडन किड्स प्री स्कूलचा आषाढी एकादशीनिमित्त दिंडी सोहळा मोठ्या उत्साहात पार पडला. दिंडीत श्री विठ्ठल रुख्मिणी, ज्ञानेश्वर माऊली, तुकाराम महाराज, छत्रपती शिवाजी महाराज, मिराबाई, मुक्ताबाई यांच्या वेशभूषेत असलेल्या दिंडीतील चिमुकल्यांनी ग्रामस्थांचे लक्ष वेधले.


केडगावमध्ये ज्ञानसाधना एज्युकेशन फाउंडेशन संचलित लंडन किड्स प्री स्कूलचा आषाढी एकादशीनिमित्त दिंडी सोहळा उत्साहात पार पडला.

## लंडन किड्स प्री स्कूलच्या बाल वारकऱ्यांनी वेधले लक्ष

टाळ–मृदुंगाच्या गजरात, विठु नामाच्या जय घोषात, पारंपरिक वारकऱ्यांच्या वेशभूषेत हातात भगवे ध्वज घेतलेले विद्यार्थी उत्स्फुर्तपणे दिंडीत सहभागी झाले होते. या दिंडीचे मुख्य आकर्षण ठरले ते बाल वारकऱ्यांचा रिंगण सोहळा. शाळेपासून शाहूनगर बस स्टॉप मार्गे माधवनगर मधील विठ्ठल मंदिर पर्यंत पायी दिंडी काढण्यात आली. दिंडीत सहभागी विद्यार्थ्यांनी सामाजिक संदेश देणारे फलक हातात घेतले होते.

साधु संत येता घरी, तोचि दसरा दिवाळी, हा सुख सोहळा स्वर्गी नाही, चला गजर करूया विठु माऊलीचा!, रुजवू मराठी फुलवू मराठी! चला बोलू मराठी, बेटी बचाव बेटी पढाव, एक पाऊल स्वच्छतेकडे या आशयाचे फलक विद्यार्थ्यांनी झलकवले. दिंडीत विद्यार्थ्यांसह पालक देखील सहभागी झाले होते. यावेळी विद्यार्थ्यांना आपल्या महाराष्ट्राची परंपरा असलेल्या वारकरी संप्रदायची माहिती सांगण्यात आली. उमा भोर व राजेंद्र भोर यांच्याकडून दिंडीतील बाल वारकऱ्यांना प्रसादाचे वाटप करण्यात आले.

दिंडीचे प्रारंभ श्री विठ्ठल रुख्मिणी मूर्तिचे पूजन करून करण्यात आले. ठिकठिकाणी ग्रामस्थांनी दिंडीचे स्वागत करून पालखीची पूजा केली. कार्यक्रमासाठी संस्थचे सचिव संदीप भोर, खजिनदार प्रसाद जमदाडे, मुख्याध्यापिका रुचिता जमदाडे, सुप्रिया मुळे, कल्याणी शिंदे, सपना साबळे, प्रतिभा साबळे, जयश्री साठे, स्मिता गोवर्धन, वाळेकर मावशी, गोंदके मावशी आदींसह पालक व नागरिक उपस्थित होते.


श्री नाथ विद्या मंदिर विद्यालयाच्या बाल दिंडीचे पालखी पूजन श्री व सौ. आश्विनी गोविंद मालपाणी यांच्या हस्ते झाले. (छाया – विजय मते)

# शालेय विद्यार्थ्यांवर आज आध्यात्मिक संस्काराची गरज

## गोविंद मालपाणी यांचे प्रतिपादन; श्रीनाथ विद्यामंदिराच्या बाल दिंडीने भाविक नागरिक भारावले

नगर – भारतीय हिंदू संस्कृतीत सण–उत्सव हे केवळ आनंदाचे निमित्त नसून, संस्काराचे माध्यम देखील आहेत. गणेशोत्सव, नवरात्र, आषाढी वारी, गुढीपाडवा यांसारख्या सणांमधून आपली परंपरा टिकून आहे. आजच्या यांत्रिक जीवनशैलीत शालेय विद्यार्थ्यांवर आध्यात्मिक संस्कार होणे ही काळाची गरज आहे. कारण मूल्ये, श्रद्धा, संयम आणि सेवा यांचे बाळकडू लहान वयातच मिळाले पाहिजे, असे प्रतिपादन गोविंद मालपाणी यांनी केले.

वसंत टेकडी येथील श्रीनाथ विद्यामंदिर येथे आषाढी वारी निमित्त बाल दिंडीचे आयोजन करण्यात आले होते. पालखीचे पूजन गोविंद मालपाणी व सौ. अश्विनी मालपाणी यांच्या हस्ते करण्यात आले. कार्यक्रमाला संस्थेचे सहसचिव रामकिसन देशमुख, खजिनदार दादासाहेब भोईटे, मुख्याध्यापिका अनिता सिद्धम, प्राचार्य विजया नवले, शिक्षकवृंद व पालक उपस्थित होते.

उद्योजक मालपाणी पुढे म्हणाले, विद्यार्थ्यांच्या मनामध्ये भक्तीभाव रुजवणे आणि सामाजिक एकोपा वाढवणे ही शिक्षण संस्थांची जबाबदारी आहे. अध्यात्म आणि संस्कृती यांचा संगम झाला, तर विद्यार्थ्यांचे व्यक्तिमत्त्व समृद्ध होते. श्रीनाथ विद्यामंदिरासारख्या शाळा या परंपरेचा वारसा पुढे नेतात, ही बाब निश्चितच कौतुकास्पद आहे.

प्राथमिक विभागातील बालचिमुकल्यांनी विठ्ठल–रुक्मिणी, ज्ञानेश्वर, तुकाराम, एकनाथ, संत सावता माळी आदी संतांच्या वेषभूषेत दिंडीत सहभाग घेतला. विठू नामाचा गजर करीत काढण्यात आलेली ही पालखी मिरवणूक शिवनगर येथील मंदिरात पोहोचली. तेथे भाविकांच्या उपस्थितीत रिंगण सोहळा आणि प्रदक्षिणा पार पडली. सिद्धेश्वर मंदिरात भजनी मंडळाच्या वतीने बाल वारकऱ्यांना फराळाचा प्रसाद देण्यात आला. यावेळी माजी नगरसेवक निखिल वारे, बाळासाहेब पवार, मंडळाचे बबन नागरे, अनिल काळे, महेंद्र पांदे, भजनी मंडळाच्या महिला, सदस्य उपस्थित होते.

कार्यक्रमाचे समारोप करताना मुख्याध्यापिका अनिता सिद्धम यांनी पालक, वारकरी, भजनी मंडळ व शिक्षकांचे आभार मानले.

# भुतकरवाडीत बाल वारकऱ्यांची दिंडी उत्साहात

## स्ट्रॉबेरी लिटिल स्टार प्री प्रायमरीच्या विद्यार्थ्यांनी वेधले लक्ष, टाळ–मृदूंगाच्या निनादात जय हरी विठ्ठल, ज्ञानोबा–तुकोबांचा जयघोष

नगर – भुतकरवाडी येथील स्ट्रॉबेरी लिटिल स्टार प्री प्रायमरी स्कूलची आषाढी एकादशीनिमित्त काढण्यात आलेली बाल वारकऱ्यांची दिंडी उत्साहात पार पडली. या दिंडीत श्री विठ्ठल–रुक्मिणी, ज्ञानेश्वर माऊली, तुकाराम महाराज व विविध संत व वारकऱ्यांच्या वेशभूषेत सहभागी झालेल्या चिमुकल्या विद्यार्थ्यांनी सर्वांचे लक्ष वेधले.


भुतकरवाडी येथील स्ट्रॉबेरी लिटिल स्टार प्री प्रायमरी स्कूलची आषाढी एकादशीनिमित्त काढण्यात आलेली बाल वारकऱ्यांची दिंडी उत्साहात पार पडली.

पांढरी टोपी, कपाळी गंध, पायजमा, बंडी या पोशाखातील लहान मुले, तर रंगीबेरंगी साड्या परिधान करुन मुली डोक्यावर तुलसी वृंदावन घेऊन आपल्या पालकांसह दिंडीत सहभागी झाल्या होत्या. ज्ञानोबा... तुकाराम... च्या जयघोषाने परिसर निनादला. भुतकरवाडी परिसरातून या दिंडीचे मार्गक्रमण झाले. या चिमुकल्यांची दिंडी पाहण्यासाठी नागरिकांनी गर्दी केली होती. तर दिंडीतील पालखीचे चौका–चौकात स्वागत करण्यात आले. शाळेच्या परिसरात विद्यार्थ्यांचा रिंगण सोहळा पार पडला. महादेव मंदिराच्या परिसरात दिंडीची सांगता झाली. शालेय संचालिका स्वाती डोमकावळे यांच्या मार्गदर्शनाखाली बालकांची दिंडी रंगली होती.

जिल्हा उद्योग कार्यालय व समृद्धी महिला बहुउद्देशीय सोसायटी अहमदनगर यांच्या संयुक्त विद्यमाने युवक कल्याण योजनेअंतर्गत दिंडीतील बालकांची आरोग्य तपासणी करुन त्यांच्या पालकांना मुलांच्या सदृढ आरोग्यासाठी मार्गदर्शन करण्यात आले.

डॉ. गणेश मिसाळ म्हणाले की, लहान मुले म्हणजे विकसित होणारे शरीर आणि तेजस्वी होत जाणारे मन, त्यांना वाढीसाठी आणि ऊर्जा मिळवण्यासाठी अधिक पोषणाची गरज असते. जर बालपणात त्यांना योग्य आणि संतुलित आहार दिला गेला, तर त्यांची रोगप्रतिकारक शक्ती वाढते, शारीरिक व बौद्धिक विकास चांगला होत असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

दिंडी सोहळा यशस्वी करण्यासाठी सविता सब्बन, धनश्री काळे, सायली गायकवाड, प्रांजली जोशी आदींसह पालकांनी परिश्रम घेतले.

# अहिल्यानगर शहरामध्ये ५ जुलै रोजी भगवान श्रीजगन्नाथ रथयात्रा महोत्सव

नगर – जगन्नाथपुरीला जे भाविक जावू शकला नाहीत, त्यांच्यासाठी अहिल्यानगर शहरात ५ जुलै रोजी १ वाजता ’भगवान श्रीजगन्नाथ रथयात्रा महोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. यात सहभागी व्हावे.

इस्कॉन आयोजित रथयात्रा महोत्सवाला गुलमोहर रोड, आम्रपाली गार्डनपासून प्रारंभ होऊन पारिजात चौक, गुलमोहर रोड, सोनानगर, प्रेमदान चौक या मार्गे पुन्हा आम्रपाली गार्डन येथे समारोप होईल. उपस्थित राहण्याचे आवाहन इस्कॉन मंदिर समितीकडून करण्यात आले आहे. महाप्रसाद आणि मोफत बस सेवा उपलब्ध. माहितीसाठी संपर्क: ९९७००८३१००, ७५८८१८९५४५.

# दिव्यांग जलतरणपटू अक्षय वैद्य विशेष दिव्यांग गौरव पुरस्काराने सन्मानित

नगर – दिव्यांग जलतरणपटू अक्षय सुनील वैद्य याला माहेर संस्थेतर्फे राळेगणसिद्धी या ठिकाणी अण्णा हजारे यांच्या हस्ते विशेष दिव्यांग गौरव पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.



अक्षय वैद्य हा दिव्यांग जलतरणपटू असून, जलतरणमध्ये दिव्यांग गटातून विविध बक्षिसे पटकावली आहेत. तर समुद्रात देखील पोहण्याचा विक्रम त्याने केलेला आहे. तसेच कोरोना काळात केलेल्या समाज जागृतीचे कार्य आणि नुकतेच दिव्यांग मुलीशी विवाह करून समाजात एक वेगळा आदर्श निर्माण केला. या कार्याची दखल घेऊन माहेर संस्थेच्या वतीने अक्षय वैद्य याला विशेष दिव्यांग गौरव पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.

# फोरकास इंम्पेक्स प्रायव्हेट लिमिटेड कंपनीकडून मदतीचा धनादेश

नगर – एमआयडीसी अहिल्यानगर येथील फोरकास इंम्पेक्स प्रायव्हेट लिमिटेड कंपनीचे संचालक उद्योजक राजेश जग्गी व सौ. नंदिनी जग्गी यांनी रोटरी क्लब ऑफ एम्पावरिंग युथच्या थीम नुसार रोटरी युनाइट फॉर गुड या उपक्रमा अंतर्गत महात्मा फुले एज्युकेशन सोसायटी, सावेडी, अहिल्यानगर या संस्थेच्या बांधकामासाठी रक्कम रू. ६,००,००० मदतीचा धनादेश प्रदान केला. धनादेश महात्मा फुले एज्युकेशन सोसायटीचे सचिव नामदेव गाडीलकर, माध्यमिक विद्यालयाचे मुख्याध्यापक अनिल गायकवाड, प्राथमिक विद्यालयाच्या मुख्याध्यापिका श्रीमती काळे लतिका यांनी स्विकारला.


एमआयडीसी येथील फोरकास इंम्पेक्स प्रायव्हेट लिमिटेड कंपनीचे संचालक उद्योजक राजेश जग्गी व सौ. नंदिनी जग्गी यांनी महात्मा फुले एज्युकेशन सोसायटी या संस्थेच्या बांधकामासाठी ६,००,००० रुपये मदतीचा धनादेश प्रदान केला.

श्री. व सौ. जग्गी यांच्यासारख्या दानशूर व्यक्ती विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक व भौतिक गरजा ओळखून एक हात मदतीचा देण्यासाठी सतत पुढे असतात असे गौरवोद्गार नामदेवराव गाडीलकर यांनी कृतज्ञतापूर्वक व्यक्त केले.

याप्रसंगी रोटरी क्लब ऑफ एम्पॉवरिंग युथच्या सचिव डॉ. बिंदू शिरसाठ व सदस्या शिलू मकर उपस्थित होत्या. विद्यालयातील बाबासाहेब शिंदे, श्रीमती मनिषा बोर्डे, श्रीमती संगिता बनकर, श्रीमती सुरेखा गर्जे, श्रीमती जयश्री देशप उपस्थित होते.

# आषाढी एकादशीनिमित्त अहिल्यानगरमध्ये ‘अभंगनृत्य’ कार्यक्रमाचे ६ जुलै रोजी आयोजन




नगर – आषाढी एकादशी निमित्त नृत्यसाधक संस्थेच्या वतीने ‘अभंगनृत्य’ ही अनोखी नृत्यसेवा विठ्ठलाच्या चरणी अर्पण करण्यात येणार आहे. ६ जुलै रोजी सायंकाळी ६ ते ७ या वेळेत गुलमोहर रोड आनंद शाळेजवळील विठ्ठल रुक्मिणी मंदिरात हा कार्यक्रम सादर होणार आहे. जाऊ संतांची या गावा या कार्यक्रमात विविध संतांच्या अभंगावर आधारित भरतनाट्य व नृत्यविष्कार विद्यार्थिनी सादर करणार आहेत, अशी माहिती अश्विनी भावे यांनी दिली. अभंगनृत्य या कार्यक्रमाची संकल्पना आश्लेषा पोतदार यांनी असून यामध्ये नृत्य साज अकॅडमीच्या विद्यार्थिनी, राधिका डान्स अकॅडमीच्या विद्यार्थिनी व नृत्य दर्पण डान्स ॲकॅडमीच्या विद्यार्थिनी सहभागी होणार आहेत. हा कार्यक्रम सर्व नागरिकांसाठी विनामूल्य खुला आहे. या अनोख्या कलाविष्काराचा लाभ घ्यावा, असे आवाहन कविता भांबरे व अर्पणा थत्ते यांनी केले आहे.

विज्ञानविश्वाची माहितीपूर्ण रंजक सफर

# विज्ञानवार्ता

## भाजीत भाजी मेथीची

मेथी दाणे असोत किंवा मेथीची हिरवीगार भाजी, आरोग्यासाठी त्यांचा अनेक प्रकारे लाभ होत असतो. मेथीची पाने थोडी कडवट चवीची असल्याने काही लोकांना ही भाजी आवडत नाही. मात्र, शेंगदाण्याचा कूट किंवा डाळ घालून केलेली ही भाजी बहुतांश घरांमध्ये आवडीने खाल्ली जाते. अर्थात, केवळ चवीसाठी नव्हे, तर विविध प्रकारच्या



आरोग्यलाभासाठी ही बारा महिने उपलब्ध होणारी भाजी गुणकारी असल्याचे तज्ज्ञ सांगतात.

मेथीच्या भाजीच्या नियमित सेवनाचे हे काही लाभ... मेथीची पालेभाजी आपली पचनशक्ती वाढवण्यास मदत करते. जर तुम्ही रोज मेथीची भाजी खाल्ली, तर पचनाच्या समस्या अगदी सहज दूर होतील. या भाजीत असे काही गुणधर्म आहेत, जे हार्ट अ‍ॅटॅक आणि हार्ट फेल्युअरसारख्या समस्यांपासून दूर राहतात. मेथीची पाने खाल्ल्याने शरीरातील खराब कोलेस्ट्रॉल बाहेर पडते, ज्यामुळे तुम्ही सहज निरोगी राहता. जर तुम्ही रोज मेथीची भाजी खाल्ली, तर तोंडातील सर्व समस्या दूर होतात आणि श्वासाची दुर्गंधी दूर होईल. आता थंडीचे दिवस सुरू होत आहेत. हिवाळ्यात शरीर ऊबदार ठेवण्यासाठीही मेथी गुणकारी ठरते. आजार बरे करण्याबाबत बऱ्याच अंशी मेथीचे गुण दालचिनीसारखे असतात. विशेषतः मधुमेधावर मेथीचे सेवन गुणकारी ठरू शकते, असे तज्ज्ञ सांगतात. त्यामुळे रोज मेथीची भाजी खाण्याचा प्रयत्न करा, असे तज्ज्ञ सांगतात.


## सॅन दियागोचा 'चकाकता' सागर

'पीबीएस नेचर' ने अमेरिकेतील सॅन दियागोच्या किनारपट्टीजवळ समुद्रातील चमकदार निळी रोषणाई कॅमेऱ्यात टिपून तिचे फुटेज प्रसिद्ध केले आहे. समुद्राच्या लाटा निळ्या प्रकाशात लकाकत असताना यामध्ये दिसतात. ही निळी रोषणाई बायोल्युमिनेसेंट अल्गी म्हणजेच प्रकाश देणाऱ्या किंवा चकाकणाऱ्या शैवालांची आहे.



समुद्रातील हा निळ्या रोषणाईचा नैसर्गिक खेळ अनेक लोकांच्या डोळ्यांचे पारणे फेडणारा होता. अनेक देशांमध्ये किंवा अनेक किनाऱ्यांवर अशी निळी रोषणाई पाहायला मिळते. भारतातही काही किनाऱ्यांवर समुद्रकिनारी असा निळा प्रकाश पाहायला मिळत असतो. काही दिवसांपूर्वीच चेन्नईतील किनाऱ्यावरही समुद्राच्या लाटा अशा निळ्या प्रकाशात चमकत असताना दिसल्या होत्या. आता सॅन दियागोच्या या व्हिडीओने लोकांचे लक्ष वेधून घेतले आहे. 'डायनोफ्लॅगेलेटस' नावाच्या एकपेशीय वनस्पती किंवा सूक्ष्म जीवांचा हा प्रकाश असतो. अंतर्गत रासायनिक क्रियेतून ते 'बायोल्युमिनन्स' नावाचा असा प्रकाश निर्माण करू शकतात. ज्यावेळी त्यांना काही धोका वाटतो, त्यावेळी ते आपल्या शिकाऱ्यांना दूर ठेवण्यासाठी असा निळा प्रकाश निर्माण करतात. ज्यावेळी त्यांची संख्या अधिक असते, त्यावेळी प्रत्येक लाटेबरोबर असा निळा प्रकाश दिसतो. त्यावेळी अब्जावधी पेशी असा प्रकाश निर्माण करून चकाकतात व हे दृश्य अत्यंत मनोरम दिसते. २०२० मध्येही सॅन दियागोच्या किनाऱ्यावर असा 'अल्गल ब्ल्यूम' पाहायला मिळाला होता. ◆◆◆

## सर्वांत लहान तापमापक



सर्वांत लहान किंवा मोठ्या आकाराच्या वस्तू नेहमीच लोकांचे लक्ष वेधून घेत असतात. सध्याच्या नॅनो टेक्नॉलॉजीच्या काळात अत्यंत सूक्ष्म अशा वस्तूही बनवल्या जात आहेत. वैज्ञानिकांनी जगातील सर्वांत लहान तापमापक तयार केलेला असून, तो मानवी केसापेक्षा वीस हजार पटींनी लहान आहे. डीएनएच्या रचनांचा वापर करून तो तयार केला आहे. विशिष्ट तापमानाला घडी घातल्या जाणाऱ्या तर विशिष्ट तापमानाला उलगडत जाणाऱ्या जनुकांचा वापर त्यात केला आहे. नैसर्गिक व मानवनिर्मित नॅनो तंत्रज्ञानाचा वापर यात करण्यात आला आहे.

साठ वर्षांपूर्वी या एका शोधानुसार डीएनएचे रेणू आपली माहिती सांकेतिक भाषेत ठेवत असतात; पण उष्णता मिळाल्यावर ही माहिती उघड होते. कॅनडातील मॉन्ट्रियल विद्यापीठाचे प्राध्यापक अलेक्सिस बेलिस्ले यांनी सांगितले, की अलीकडील काही वर्षांत जैव रसायनशास्त्रज्ञांनी जैवरेणू म्हणजे प्रथिने किंवा आरएनए (डीएनएसारखाच एक रेणू) यांचा वापर नॅनो तापमापक म्हणून केला आहे. डीएनएचे उलगडणे व गुंडाळणे यांचा वापर करून त्यात तापमान मोजले जाते. या नैसर्गिक तापमापकांवरून प्रेरणा घेऊन डीएनए तापमापक तयार केले आहेत. ते मानवी केसापेक्षा २० हजार पट लहान आहेत व आम्ही अशा डीएनए रचना तयार केल्या आहेत, ज्या विशिष्ट तापमानाला उकलतात व तापमान मोजले जाते. याचा महत्त्वाचा फायदा असा, की डीएनएचा वापर करून रेण्वीय तापमापक तयार केले आहेत. त्यात डीएनएच्या रासायनिक गुणांचा वापर केला आहे. डीएनए हा चार वेगवेगळ्या रेणूंचा बनलेला असतो. त्यात न्युक्लिओटाईड ए हा न्युक्लिओटाईड टी या रेणूशी कमकुवत बंधाने जोडलेला असतो, तर न्युक्लियोटाईड सी हा न्युक्लिओटाईड जी बरोबर जास्त घट्ट बांधलेला असतो असे मॉन्ट्रियल विद्यापीठाचे डेव्हिड गॅरो यांचे मत आहे. या साधारण रचनांचा उपयोग करून काही डीएनए रचना अशा तयार केल्या ज्या विशिष्ट तापमानाला गुंडाळल्या किंवा उलगडल्या जातील. डीएनए रचनांना प्रकाशीय संवेदक जोडले जातात व त्यामुळे ५ नॅनोमीटर आकाराचे तापमापक तयार करणे शक्य होते, असे मॉन्ट्रियल विद्यापीठाचे अमाद डेसोरियर्स यांनी सांगितले. हे नॅनो तापमापक म्हणजे नॅनो तंत्रज्ञानाची नवीन शाखा ठरणार आहेत व त्यामुळे रेणवीय जीवशास्त्राचे नवे आकलन होणार आहे.

'नॅनो लेटर्स' या नियतकालिकात हे संशोधन प्रसिद्ध झाले आहे.

## पुच्छहीन धुमकेतू

धूमकेतूंबाबत संशोधकांपासून सर्वसामान्यांपर्यंत सर्वांनाच कुतूहल असते. धूमकेतू म्हटले की, डोळ्यासमोर उभा राहतो तो त्याचा पिसारा किंवा लांबलचक शेपूट; पण असा पिसारा नसलेला धूमकेतूही खगोल वैज्ञानिकांनी शोधलेला आहे. त्याच्या रचनेचा अभ्यास करून सौरमालेच्या निर्मितीविषयी काही प्रश्नांची उत्तरे मिळणार आहेत. खूप कमी क्रियाशील असलेल्या या धूमकेतूचे नाव सी/२०१४ एस ३ (पॅनस्टार्स) असे असून तो सौरमालेच्या अंतर्गत भागातील द्रव्याचा बनलेला आहे. पृथ्वीची निर्मिती झाली होती त्या काळाच्या माहितीवर यामुळे प्रकाश पडू शकेल.



हा धूमकेतू लंबाकार कक्षेचा असून, त्याचा कक्षीय काळ ८६० वर्षे आहे. उर्टच्या ढगात तो तयार झाला असावा, असा अंदाज आहे. सौरमालेच्या बाहेरच्या भागात जे बर्फाळ तुकडे आहेत त्याला उर्टचा ढग म्हटले जाते. हा धूमकेतू अलीकडेच सूर्याजवळ आला होता. सी / २०१४ एस ३ (पॅनस्टार्स) हा धूमकेतू लांब कक्षा असलेला पहिलाच आहे. त्याच्या अंतरंगात सौरमालेतील लघुग्रहांचे गुणधर्म असावेत, असा अंदाज आहे. सौरमाला कशी तयार झाली, यावर या धूमकेतूच्या अभ्यासातून प्रकाश पडणार आहे. या धूमकेतूत पृथ्वीसारखे ग्रह ज्याचे बनले आहेत ते द्रव्य असू शकते. आपल्याला अनेक लघुग्रह माहिती आहेत; पण ते सूर्याजवळ राहून अब्जावधी वर्षांत भाजले गेले आहेत, असे हवाई विद्यापीठाचे कॅरेन मीट यांनी सांगितले. हा धूमकेतू म्हणजे सूर्याच्या उष्णतेचा परिणाम नसलेला धूमकेतू म्हणता येईल, असे सांगून त्यांनी म्हटले आहे की, हा धूमकेतू वेगळा आहे हे लगेच आमच्या लक्षात आले होते. कारण त्याला शेपूट नाही व त्याचा कक्षीय काळही मोठा आहे. सूर्याजवळ येताना या धूमकेतूचे चित्र वेगळेच दिसते. शेपटी नसलेल्या मांजरीला मॅक्स म्हणतात, त्यामुळे या धूमकेतूला मॅक्स कॉमेट असे म्हटले जाते. या धूमकेतूच्या वर्णपंक्तीचा अभ्यास केला असता तो एस आकाराच्या लघुग्रहांचे गुणधर्म दाखवतो. लघुग्रह पट्ट्याच्या अंतर्गत भागात असलेल्या लघुग्रहांप्रमाणे या धूमकेतूचे लघुग्रह आहेत. तो कमी क्रियाशील असून, त्यात बर्फाची बाफ होत आहे व तो सूर्यापासून याच अंतरावर असलेल्या धूमकेतूंपेक्षा कमी क्रियाशील आहे. उर्टच्या ढगात जे द्रव्य असते तेच या धूमकेतूत असावे, असा अंदाज आहे. ◆◆◆

## न उलगडलेली पाच रहस्ये!

आजही जगात अशा काही गोष्टी आहेत ज्यांचे उत्तर किंवा त्यामागील कारण कोणालाच कळू शकलेले नाही. वास्तविक, विज्ञानाने एवढी प्रगती केली आहे की प्रत्येक गोष्टीचे स्पष्टीकरण देण्यासाठी आपल्याकडे काहीतरी आहे. असे असूनही, जगात अशी काही ठिकाणे किंवा गोष्टी आहेत ज्यासाठी त्यामागील विज्ञान सापडत नाही. आजही पृथ्वीवर अशा काही गोष्टी आहेत ज्यांचे रहस्य कोणीही उघड करू शकलेले नाही.




**अँटिकिथेरा :** ग्रीक बेटावर अँटिकिथेरामध्ये एका रहस्यमय जहाजाचा अवशेष सापडला. यंत्रसामग्रीचा हा अत्यंत प्राचीन भाग रहस्यमय मानला जात असे. बहुतेक लोकांचा असा विश्वास होता की हा जगातील पहिल्या ॲनालॉग संगणकाचा भाग होता. ते १०० इउ चा आहे आणि खगोलीय गणनेसाठी वापरला जात असे. त्याची रचना बरीच गुंतागुंतीची आहे, जी प्राचीन ग्रीक लोकांची प्रगत यांत्रिक समज दर्शवते. शास्त्रज्ञ आणि अभियांत्रिकी इतिहासकार अजूनही या तुकड्यावर संशोधन करत आहेत.

**गिझाचा ग्रेट पिरॅमिड**



दुसरे रहस्य गिझाचा ग्रेट पिरॅमिड आहे, जो २५८० ते २५६० बीसी दरम्यान बांधल्याचा दावा केला जातो. हे प्राचीन अभियांत्रिकीचे उदाहरण आहे. प्राचीन काळी जेव्हा दगड उचलण्यासाठी आणि ठेवण्यासाठी यंत्रेदेखील नव्हती तेव्हा ते इतके अचूकपणे कसे बांधले गेले असेल याची कल्पनाही करू शकत नाही. त्यात योग्य मोजमाप करून जड दगड कसे ठेवता आले असते हे आजही एक कोडेच आहे.

**पेरूमधील प्राचीन किल्ला :** हा किल्ला त्याच्या अद्भुत अभियांत्रिकीसाठी ओळखला जातो. हा किल्ला दगडांनी बनवला आहे आणि आश्चर्याची गोष्ट म्हणजे प्रत्येकी १०० टन वजनाच्या दोन दगडांमध्ये एक पेंढा देखील घालता येणार नाही, अशाप्रकारे ठेवण्यात आला आहे. यावरून इनकॅन अभियांत्रिकीचे कौशल्य दिसून येते. एवढे मोठे आणि जड दगड कसे आणले गेले असतील आणि ते कसे बसवले गेले असतील आणि कसे बसवले गेले असतील याचे संशोधकांना अजूनही आश्चर्य वाटते.



**नाझ्का लाइन्स :** हे दक्षिण पेरूमधील नापीक जमिनीतून कोरले गेले होते. हे नाझ्का लोकांनी ५०० बीसी ते ५०० अऊ दरम्यान बांधले होते. यामध्ये सरळ रेषांपासून ते प्राणी आणि वनस्पतींच्या जटिल आकारांपर्यंत सर्व काही समाविष्ट आहे. हे का केले गेले यावर बरेच संशोधन केले गेले, परंतु त्याचे अचूक उत्तर कोणाकडेच नाही. काही शास्त्रज्ञ म्हणतात की हे ज्योतिषशास्त्रीय गणनेसाठी बनवलेले आहेत तर काही म्हणतात की ते धार्मिक प्रतीक आहेत.



**कुतूब कॉम्प्लेक्समधील लोह स्तंभ :** दिल्लीच्या कुतूब कॉम्प्लेक्समध्ये असलेला लोह स्तंभ हे देखील असेच एक कोडे आहे, जे अद्याप सुटलेले नाही. इ. स. ४०० मध्ये बांधलेला हा लोखंडी स्तंभ ७ मीटर उंच आहे आणि मौर्य साम्राज्याच्या काळात बांधला गेला होता. आश्चर्याची बाब म्हणजे तेव्हापासून आजतागायत हा स्तंभ तसाच उभा असून त्यावर थोडासा गंजही पडलेला नाही. १६०० वर्षांत त्याचे कोणतेही नुकसान झाले नाही. त्यावर तत्कालीन साम्राज्यातील अनेक प्रसंग आणि राजे कोरलेले आहेत, जे इतिहासाच्या दृष्टिकोनातून खूप महत्त्वाचे आहेत.

## कार नव्हे, टायरची किंमत चार कोटी!

हल्ली कोणत्या वस्तू सोन्या-चांदीने आणि हिऱ्यांनी मढवल्या जातील हे काही सांगता येत नाही. कमोडपासून चपलांपर्यंत अनेक वस्तू याच कारणामुळे मौल्यवान बनवण्यात आलेल्या आहेत. मोटारीला वापरण्यात येणाऱ्या टायरची किंमत अशी किती असू शकते, असा प्रश्न कोणाला विचारला तर तो काही हजारांमध्ये असेल, असे सांगू शकतो; पण याच टायरची किंमत कोटींच्या घरात असेल, असे तुम्हाला सांगितले, तर तुमचा विश्वास बसणार नाही; पण हे खरे आहे. दुबईमध्ये काही वर्षांपूर्वी झालेल्या एका व्यवहारात एका ग्राहकाने तब्बल ४ कोटी रुपयांना चार टायर विकत घेतले होते. विशेष म्हणजे, हे टायर विकत घेणारी व्यक्ती भारतीयच आहे. या टायरची नोंद 'गिनीज बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड'मध्येही झाली होती. या टायरना इतकी किंमत मिळण्याचेही हेच कारण आहे!



या सर्व टायर २४ कॅरेट सोन्याने सजविण्यात आल्या आहेत. या टायरवर खास निवडून आणलेले काही हिरेही लावण्यात आले आहेत. टायर उत्पादन क्षेत्रातील जेड टायर या कंपनीने या खास टायरची निर्मिती केली आहे. या टायरचे डिझाईन दुबईमध्येच तयार करण्यात आले आणि त्यानंतर त्यांना कारागिरांकडून सजविण्यात आले. दुबईमधील रायफेन प्रदर्शनात हे टायर्स ४ कोटी रुपयांना विकले गेले.

या टायरच्या विक्रीतून मिळणारी रक्कम एका फाऊंडेशनला देण्यात येणार असल्याची माहिती कंपनीकडून देण्यात आली होती.

## प्लुटोलाही आहे चंद्र

आपल्या ग्रहमालिकेत प्लूटो हा डॉर्फ प्लॅनेट किंवा बटू ग्रह आहे. त्याला तब्बल पाच चंद्र आहेत, हे विशेष! नासाच्या हबल अवकाश दुर्बिणीने शोधलेल्या मेकमेक या बटू ग्रहालाही एक चंद्र आहे. हा चंद्र छोटा असून, चमकदार नाही तर काळा आहे. तो मेकमेक या बटूग्रहाभोवती फिरतो.



सौरमालेतील क्युपर पट्ट्यात मेकमेक हा चमकदार बर्फाळ बटू ग्रह आहे. या बटू ग्रहाच्या चंद्राचे नाव तूर्त एस/२०१५ (१३६४७२) ठेवले असले तरी एमके २ असे त्याचे टोपण नाव आहे. तो मेकमेक या ग्रहापेक्षा १३०० पट कमी प्रकाशमान आहे. त्यामुळे तो काळाच दिसतो.

एमके २ हा बटू ग्रहापासून २०,९२१ कि.मी. अंतरावर असून, त्याचा व्यास १६० कि.मी. आहे. मेकमेकचा व्यास १४०० कि.मी. आहे. मेकमेक ग्रहाचा शोध २००५ मध्ये लागला असून, त्याला इस्टर आयलंडवरील रापा नुई देवतेची निर्मिती म्हणून मेकमेक असे नाव दिले आहे. क्युपर पट्टा हा सौरमालेतील एक मोठा भाग असून, तो ४.५ अब्ज वर्षांपूर्वी सौरमालेची निर्मिती झाल्यानंतर उरलेल्या अवशेषांचा बनलेला आहे. अनेक बटू ग्रह तेथे आहेत. यातील काही ग्रहांचे उपग्रह माहिती आहेत; पण मेकमेकचा उपग्रह म्हणजे चंद्र आता सापडला आहे. इंटरनॅशनल अ‍ॅस्ट्रॉनॉमिकल युनियनने यातील पाच बटू ग्रहांना मान्यता दिली आहे. या ग्रहात प्रथमच चंद्र सापडण्याची घटना घडली आहे. हबल दुर्बिणीने वाईड फील्ड कॅमेरा तीनच्या मदतीने एप्रिल २०१५ मध्ये हा चंद्र शोधला असून, निरीक्षण पथकाने हबल दुर्बिणीच्या मदतीने २००५, २०११, २०१२ मध्ये लहान उपग्रह शोधले होते. त्याच पद्धतीने मेकमेक ग्रह व त्याचा चंद्र शोधण्यात आला आहे. यापूर्वी मेकमेकचा चंद्र सापडला नव्हता. मेकमेकच्या चंद्राची (एखाद्या ग्रहाचा नैसर्गिक उपग्रह) कक्षा ग्रहापासून जवळ आहे, म्हणजे जेव्हा तुम्ही या चंद्राकडे बघता तेव्हा तो मेकमेकच्या प्रकाशात अंधारा गोल दिसतो, असे साऊथवेस्ट रीसर्च इन्स्टिट्यूट या अमेरिकी संस्थेतील ॲलेक्स पार्कर यांनी म्हटले आहे. या चंद्राच शोध ही बटू ग्रह प्रणालींच्या संशोधनात महत्त्वातील बाब असून, त्याची कक्षा मोजून त्याचे वस्तुमान सांगता येईल. बटू ग्रहांना चंद्र असू शकतात हे यातून सिद्ध झाले आहे. मेकमेक हा प्लुटोसारखा दुर्मीळ बटू ग्रह असून, त्याचा साथीदार चंद्र शोधणे महत्त्वाचे होते, असे पार्कर यांनी सांगितले. या चंद्राच्या शोधाने मेकमेकची अधिक माहिती मिळणार असून, प्लूटो व मेकमेक यांच्यासारखे आणखी ग्रह शोधले जाऊ शकतात. प्लूटो व मेकमेक हे गोठलेल्या मिथेनचे ग्रह आहेत. प्लूटोप्रमाणेच मेकमेकच्या उपग्रहाच्या अभ्यासातून मूळ ग्रह म्हणजे मेकमेकची घनता कळणार आहे. मेकमेक व प्लुटो यात काही साम्य आहे की नाही, हे यातन स्पष्ट होईल.

## सुपरबग्जना रोखण्यासाठी...

सुपरबग्ज म्हणजे असे जीवाणू जे प्रतिजैविकांनाही दाद देत नाहीत. त्यांच्यावर कोणत्याही औषधाचा परिणाम होत नाही. अशा सुपरबग्जची आपल्याला बाधा होऊ नये, यासाठी काळजी घेणे क्रमप्राप्तच ठरते. स्मार्टफोन, दारे, खिडक्या तिथे असलेल्या जीवाणूंचे नकळत वाहक बनत असतात. मोबाईलवर तर अनेक जीवाणू असतात; पण आता हे जीवाणू माणसापर्यंत पोहोचू नयेत यासाठी एक पारदर्शक द्रावण स्वरूपातील आवरण वैज्ञानिकांनी तयार केले आहे. त्यामुळे एमआरएसए व इ कोलाय सारखे प्रतिजैविकांनाही दाद न देणारे जीवाणू पसरू शकणार नाहीत. त्यामुळे महाजीवाणूंचा प्रसार रोखता येणार आहे.

हे द्रावण कुठल्याही पृष्ठभागावर फवारल्यानंतर ते कडक बनते व त्याचे आवरण तयार होते. ते पारदर्शक असते, त्यामुळे जीवाणूंची वाढ होत नाही किंबहुना ते मरतात. या संशोधनात भारतीय वंशाचे वैज्ञानिक सुरेश सी. पिल्लई यांचा सहभाग आहे. २०५० पर्यंत महाजीवाणूंमुळे १ कोटी लोकांचा मृत्यू होण्याची भीती वर्तवण्यात आली आहे, ही संख्या कर्करोगामुळे मरणाऱ्या लोकांच्या संख्येपेक्षा अधिक असणार आहे, असे संशोधकांचे मत आहे. नॅनोतंत्रज्ञानाच्या मदतीने हे आवरण तयार करण्यात आले असून, त्यामुळे जीवाणू माणसांपर्यंत पोहोचण्याआधीच मरतात. कारण यात जीवाणूरोधक घटकांचा वापर केलेला असतो. यात जीवाणू मारण्याप्रमाणेच त्यांची वाढही रोखता येते. स्लिगो इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी या आर्यलडच्या संस्थेने हे पारदर्शक आवरण तयार केले आहे. काच, मेटॅलिक, सिरॅमिक वस्तू, संगणक, टॅबलेट



स्क्रीन, स्मार्टफोन, एटीएम, टीव्ही, हाताने धरण्याच्या आधार रेलिंग, लिफ्ट, टॉयलेटस, फ्रीज, मायक्रोवेव्ह, सिरॅमिक फरशी, भिंतीच्या टाईल्स यावर जीवाणू असतात. आता तयार केलेले आवरण विशेष करून रुग्णालयात वापरणे महत्त्वाचे ठरणार आहे. त्यामुळे महाजीवाणूंचा प्रसार होणार नाही. स्वीमिंग पूल, सार्वजनिक इमारती, बस व रेल्वेच्या काचा, हॉटेल्स येथे त्यांचा वापर करता येईल. महाजीवाणूंविरोधातील लढा यामुळे निर्णायक होणार आहे, असे आयटी स्लिगोचे वैज्ञानिक सुरेश सी. पिल्लई यांनी सांगितले. प्रत्येक व्यक्तीच्या शरीरावर जीवाणूंचा सागर असतो. मोबाईल फोनवर तर लाखो जीवाणू वास्तव्य करीत असतात, त्यावर ते वाढतात व पाच महिने जिवंत राहू शकतात, असे पिल्लई यांचे म्हणणे आहे. नवीन पारदर्शक आवरण किंवा द्रावण हे काच, सिरॅमिक यावर फवारले तर त्याचा थर त्या पृष्ठभागावर बसतो. त्यामुळे एमआरएसए व इ कोलाय तसेच बुरशीपासून संरक्षण मिळते. हे द्रावण स्मार्टफोनच्या काचेवर फवारले तर त्याचा थर बसतो व ते कडक होते पण ते पारदर्शक असते. वैज्ञानिकांनी सिरॅमिक्सवर फवारता येईल असे द्रावण तयार करण्यास पाच वर्षांपूर्वी सुरुवात केली होती, हे द्रावण किंवा नंतर त्यापासून बनणारे आवरण विषारी नसते. ते काच, धातू या पृष्ठभागांवर चपखल बसते व जीवाणूंपासून माणसाचे रक्षण करते, असे 'सायंटिफिक रिपोर्टस' या नियतकालिकात म्हटले आहे.

# स्मशानभूमीच्या दुरुस्तीची कामे सुरु करा अन्यथा सभामंडपात सर्व अंत्यविधी करणार

### दयनीय अवस्थेप्रश्नी नागरदेवळे ग्रामस्थांचा आक्रोश, अंत्यविधीसाठी करावा लागतो अनेक अडचणींचा सामना

नगर – नगर तालुक्यातील नागरदेवळे गावची स्मशानभूमी सध्या अत्यंत दयनीय अवस्थेत असून, पावसाळ्याच्या दिवसांमध्ये अंत्यविधी करणे ग्रामस्थांसाठी मोठ्या अडचणीचे ठरत आहे. या प्रश्नावर लक्ष वेधत स्मशानभूमीच्या दुरुस्तीसाठी ग्रामपंचायतने तातडीने निधी उपलब्ध करून दुरुस्तीचे काम सुरु करण्याची मागणी जालिंदर बोरुडे व ग्रामस्थांनी केली आहे. १५ दिवसांत काम पूर्ण झाले नाही, तर येथून पुढे सर्व अंत्यविधी ग्रामपंचायत कार्यालयासमोरील सभामंडपात होतील, असा इशाराही देण्यात आला आहे.

नागरदेवळे येथील स्मशानभूमीत अंत्यविधीसाठी असलेला पत्र्याचा शेड पूर्णतः जीर्ण झाला आहे. त्याला जागोजागी खड्डे पडले असून, पावसात त्या ठिकाणी अंतिम संस्कार करणे अशक्य झाले आहे. पावसाच्या दरम्यान एखादा अंत्यविधी करावयचा असल्यास पाऊस संपेपर्यंत ती अंत्ययात्रा ग्रामपंचायत समोरील सभा मंडपात थांबवावी लागते, मग पाऊस बंद झाल्यानंतर अंत्यविधीची प्रक्रिया करावी लागत आहे. मागील दोन वर्षापासून हा प्रश्न प्रलंबीत असून, तो अधिकच बिकट बनत चालला आहे. यासंदर्भात जिल्हा परिषद, ग्रामपंचायत कार्यालयाकडे पाठपुरावा करुनही त्याची दखल घेण्यात आलेली नाही.


नागरदेवळे गावच्या स्मशानभूमीची झालेली दयनीय अवस्था.

याशिवाय, स्मशानभूमीत बसण्याची कोणतीही व्यवस्था नाही. नागरिकांना उभ्याच राहून अंत्यसंस्काराला थांबावे लागते. रात्रीच्या वेळी लाईट नसल्यामुळे आणखी अडचणी निर्माण होतात. अशा दुःखद प्रसंगात लोकांना सुविधा नसल्यामुळे मनस्तापाला सामोरे जावे लागत आहे.

नव्याने पत्र्याचे मजबूत व पावसापासून संरक्षण करणारे शेड उभारावे, लाईटची योग्य व्यवस्था करण्यात यावी, दशक्रिया विधीसाठी ओटे व त्यावर शेडची व्यवस्था करावी, स्मशानभूमीला गेट उभारावे व परिसरात पेव्हिंग ब्लॉक बसवावे, अंत्यविधी आणि दशक्रिया करताना पाण्याची सोय उपलब्ध करावी, संपूर्ण परिसराची स्वच्छता व नियमित देखभाल करण्यासाठी निधी मंजूर करण्याची मागणी करण्यात आली आहे. या मागणीसाठी सागर खरपुडे हे देखील सातत्याने पाठपुरावा करत आहेत.

ग्रामस्थांना जेथे गरज आहे, तेथे विकास कामे मार्गी लावण्याची गरज आहे. स्मशानभूमीची दुरावस्था अत्यंत जिव्हाळ्याचा प्रश्न बनलेला असताना बाकीचे कामे बाजूला ठेऊन हे काम मार्गी लावावे. शेवटच्या दुःखद प्रसंगात नागरिकांना यातना सहन कराव्या लागत असून, ही मोठी शोकांतिका आहे. ग्रामपंचायत प्रशासनाने येत्या १५ दिवसात सदरचे काम मार्गी लावावे. अन्यथा यापुढील सर्व अंत्यविधी ग्रामपंचायत कार्यालया समोरील सभामंडपात केले जाणार असल्याचा इशारा जालिंदर बोरुडे यांनी दिला.


अहिल्यानगर जिल्ह्यातील सर्वसामान्य रेशनकार्ड धारकांना तीन महिन्यांचा धान्य पुरवठा अपूर्ण मिळत असल्याच्या तक्रारी वाढत आहेत. याबाबत वंचित बहुजन आघाडीच्या वतीने जिल्हा पुरवठा अधिकारी यांच्याकडे निवेदन देऊन तातडीने कारवाईची मागणी करण्यात आली आहे.

## मनमानी करणाऱ्या नगर जिल्ह्यातील रेशन दुकानदारांवर कायदेशीर कारवाई करा अन्यथा जनआंदोलन उभारणार

नगर – अहिल्यानगर जिल्ह्यातील सर्वसामान्य रेशन कार्ड धारकांना तीन महिन्यांचा धान्य पुरवठा अपूर्ण मिळत असल्याच्या तक्रारी वाढत आहेत. याबाबत वंचित बहुजन आघाडीच्या वतीने जिल्हा पुरवठा अधिकारी यांच्याकडे निवेदन देऊन तातडीने कारवाईची मागणी करण्यात आली आहे. यावेळी जिल्हाध्यक्ष योगेश साठे, हनीफ शेख, योगेश गुंजाळ, जे डी शिरसाठ, प्रवीण ओरे, सुधीर ठोंबे, रवी किसन जाधव, प्रसाद भिवसने, राजीव भिंगारदिवे, गणेश राऊत, अमर निरभवने, चरण हरबा, कैलास पगारे, कैलास काटे, प्रमोद भिंगारदिवे, विश्वास वाघस्कर उपस्थित होते.

शिष्टमंडळाने दिलेल्या निवेदनात नमूद केले आहे की, गेल्या तीन महिन्यांपासून नियमित रेशन मिळाले नसून, नागरिकांना दोनच महिन्यांचे धान्य देऊन तिसऱ्या महिन्याचे धान्य नाकारले जात आहे. अनेक ठिकाणी दुकानदारांकडून रेशन कार्ड धारकांचे अनेक वेळा अंगठे (थंब) घेतले जात असून, दुकानं वेळेवर सुरू राहत नाहीत आणि दुकानदार उपस्थित नसतात, असे निवेदनात म्हटले आहे.

याबाबत जिल्हा प्रशासनाने तातडीने लक्ष घालावे आणि मनमानी करणाऱ्या दुकानदारांवर १० दिवसांच्या आत योग्य ती कायदेशीर कारवाई करावी, अन्यथा जनआंदोलन उभारण्यात येईल, असा इशारा देण्यात आला आहे.


दर्गाह हजरत पीर बारा इमाम कोठला ट्रस्ट व जहागीरदार परिवाराच्या वतीने बारा इमाम कोठला येथे मोहरमनिमित्त भंडाऱ्याचे आयोजन करण्यात आले होते. इमामे हसन–हुसेन यांच्या सवारीच्या दर्शनाला आलेल्या भाविकांनी या भंडाऱ्याचा लाभ घेतला. यावेळी सरबतचे देखील वाटप करण्यात आले. यावेळी चेअरमन सय्यद दस्तगीर बडेसाब, खजिनदार जुबेर सय्यद, विश्वस्त शकूर शेख, ॲड. नजीर खान, सय्यद निसार बडेसाब, ॲड. फारुक शेख, खालिद सय्यद, सादिक जहागीरदार, सज्जू जहागीरदार आदींसह युवक उपस्थित होते.

## कामगार हॉस्पिटलचा प्रस्ताव राज्य शासनाकडे धूळखात पडून

### अहिल्यानगर, एमआयडीसीतील प्रश्न मार्गी लावण्यासाठी बाबु टायरवाले यांनी उद्योगमंत्री उदय सावंत यांना दिले निवेदन

नगर – शहरातील एमआयडीसी मधील कामगार हॉस्पिटलचा प्रश्न राज्य शासनाकडे अनेक वर्षांपासून धुळखात पडून आहे. तो मार्गी लावण्यासाठी उद्योग मंत्री उदय सावंत यांना निवेदन देऊन चर्चा केली. नगर एमआयडीसी हजारो कामगार काम करत असून त्यांच्या आरोग्याचा प्रश्न कायमस्वरूपी मार्गी लावणे गरजेचे आहे. दर महिन्याला कामगारांच्या पगारातून तीनशे रुपये कट होत असतात त्यांच्या हक्काचे हॉस्पिटल एमआयडीसी येथे उपलब्ध होणे गरजेचे आहे. कंपनीमध्ये एखादी अनुचित घटना घडत असते, अशावेळी त्यांना तातडीने उपचार मिळणे गरजेचे आहे. त्यामुळे त्यांचा जीव वाचू शकतो. अन्यथा एखादी दुर्दैवी घटना घडण्याची शक्यता देखील नाकारता येत नाही. कामगार हा देशाच्या जडणघडणीमधील महत्त्वाचा घटक आहे. अहिल्यानगर एमआयडीसी येथे कामगार हॉस्पिटल लवकरात लवकर करण्यासाठी शासन दरबारी पाठपुरावा करणार असल्याची माहिती शिवसेनेचे जिल्हाप्रमुख बाबु टायरवाले यांनी दिली.


एमआयडीसीमधील कामगार हॉस्पिटलचा प्रश्न मार्गी लावण्यासाठी उद्योग मंत्री उदय सावंत यांना निवेदन देऊन चर्चा करताना शिवसेनेचे जिल्हाप्रमुख बाबु टायरवाले. (छाया – लहू दळवी)

अहिल्यानगर एमआयडीसीतील कामगार हॉस्पिटल चा प्रश्न मार्गी लावण्यासाठी मंत्री उदय सावंत यांना निवेदन देऊन चर्चा करताना बाबू टायरवाले, संपर्क मंत्री शंभूराजे देसाई, अभिषेक भोसले, अमोल हुंबे आदी पदाधिकारी कार्यकर्ते उपस्थित होते.

निवेदनात पुढे बाबू टायरवाले म्हणाले, अहिल्यानगर एमआयडीसी मध्ये मोठ्या प्रमाणात छोटे–मोठे उद्योग असून मालवाहतूक करण्यासाठी विविध राज्यातून मालट्रक या ठिकाणी येत असतात त्यांना वाहनतळ उपलब्ध नसल्यामुळे रस्त्याच्या कडेलाच गाड्या लावल्या जातात. त्यामुळे वाहतूक कोंडीची समस्या निर्माण होते. तसेच छोटे–मोठे अपघात दररोज होत असतात तरी एमआयडीसीमध्ये मालवाहतूक गाड्यांना उभे राहण्यासाठी वाहनतळ निर्माण करण्यासाठी भूखंड उपलब्ध करून द्यावा, अशी मागणी केली.

मंत्री सावंत यांनी हे दोन्ही प्रश्न तातडीने मार्गी लावले जातील असे आश्वासन दिले असल्याची माहिती बाबु टायरवाले यांनी दिली.

## मोहरमच्या चादर मिरवणुकीत डीजे वाजविणाऱ्या दोन मंडळ चालकांवर गुन्हा दाखल

नगर – मोहरम सणानिमित्त शहरातील बाबा बंगाली शाह यंग पार्टी आणी मौला फ्रेंड सर्कल यंग पार्टी तर्फे काढण्यात आलेल्या चादर मिरवणुकीत परवानगीनुसार अटींचा भंग करुन प्रचंड आवाजात डीजे वाजवून व घोषणाबाजी करीत सर्वोच्च न्यायालयाच्या निर्देशाचा भंग करीत ध्वनीप्रदूषण केल्याची घटना २ जुलै रोजी समोर आली.

या प्रकरणी बाबा बंगाली शाह यंग पार्टी मंडळाचे अध्यक्ष अजहर रेहमान शेख (रा. बाबा बंगाली चौक अ.नगर) व डीजे चालक आसिफ मुख्तार खान (रा. शंभूराजे चौक, बोल्हेगाव, अ.नगर) तसेच मौला फ्रेंड सर्कल व यंग पार्टी मंडळाचे अध्यक्ष आवेज तमोजूद्दीन काझी (रा.जुनाबाजार, अ.नगर), डीजे चालक वैभव ईश्वर साबळे (रा. घोसपुरी, ता. नगर) यांच्या विरुद्ध गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. मिरवणूक संपल्यानंतर पोलिसांनी डीजे जप्त केले आहेत.

## मध्य शहरातील रस्ता काँक्रीटीकरणच्या कामांना गती देण्याचे आयुक्तांचे आदेश

### अहिल्यानगर महानगरपालिकेकडून शहरात रस्ता पॅचिंगच्या कामाला सुरुवात : यशवंत डांगे



नगर – मध्यवर्ती शहरात काही प्रमुख रस्त्यांच्या काँक्रीटीकरणाची कामे सध्या सुरू आहेत. मात्र, ज्या भागात कामे प्रस्तावित नाहीत, अशा ठिकाणी खड्डे बुजवण्याचे आदेश देण्यात आले होते. त्यानुसार महानगरपालिकेच्या बांधकाम विभागाकडून विविध रस्त्यांवर पडलेले खड्डे बुजविण्यासाठी पॅचिंगचे काम सुरू करण्यात आले असल्याची माहिती आयुक्त तथा प्रशासक यशवंत डांगे यांनी दिली.

महानगरपालिकेकडून दरवर्षी मे महिन्यात रस्ता पॅचिंगची कामे केली जातात. यावर्षी मे महिन्यात अवकाळी पावसामुळे हे काम रखडले होते. गेल्या काही दिवसांपासून पावसाने उघडीप दिल्यामुळे खड्डे बुजविण्यासाठी तातडीने काम सुरू करण्याच्या सूचना देण्यात आल्या होत्या. त्यानुसार कामाला सुरुवात करण्यात आली आहे.

शहरातील कोर्ट गल्ली, आनंदी बाजार, सबजेल चौक, हातमपुरा, जुना मंगळवार बाजार, कापड बाजार, गंज बाजार, बुरुडगल्ली, चौपाटी कारंजा, अर्बन बँक चौक, डाळ मंडई, नालेगाव, मंगळगेट, सर्जेपूरा रस्ता अशा विविध ठिकाणी रस्त्यावरील खड्डे बुजवण्याचे काम सुरू करण्यात आले आहे.

शहराच्या मध्यवर्ती भागात प्रमुख रस्त्यावर रस्ता काँक्रीटीकरण सुरू आहे. तेथील ड्रेनेज लाईनची कामे पूर्णत्वास आहेत. या ठिकाणी अतिक्रमणे काढून काँक्रीटीकरणाची कामे सुरू करण्याचे नियोजन करण्यात आले आहे. या कामांना गती देण्याचे आदेश देण्यात आले आहेत. टप्प्याटप्प्याने ही कामे पूर्ण करण्यात येत असल्याचे यशवंत डांगे यांनी सांगितले.

# १५ दिवसात केडगाव उपनगराचा वीजपुरवठा सुरळीत करण्याचे महावितरणकडून आश्वासन

नगर – केडगाव उपनगराचा गेल्या एक महिन्यापासून विजेचा लपंडाव चालू आहे, त्यामुळे परिसरातील नागरिक त्रस्त झाली आहे. कुठलीही पूर्वसूचना न देता रात्री अपरात्री लाईट जात असल्यामुळे नागरिकांमध्ये महावितरण कंपनीविरोधात संतापची लाट आहे. विद्युत पुरवठा सुरळीत व्हावा यासाठी निवेदनाद्वारे आंदोलनाचा इशारा दिला होता. त्यानुसार प्रशासनाने आंदोलन न करण्यासाठी पत्र व्यवहार केला व बैठकीचे आयोजन करून केडगाव उपनगराचे विजेचे प्रश्न पुढील १५ दिवसात सोडविण्याचे आश्वासन अतिरिक्त कार्यकारी अभियंता एस आर राहींज यांनी बैठकीत दिले असल्याची माहिती मनपा स्थायी समितीचे माजी सभापती मनोज कोतकर यांनी दिली. यावेळी सहाय्यक अभियंता राहुल शिलावत व कर्मचारी उपस्थित होते

विद्युत विभागाने अडथळा ठरणाऱ्या झाडाच्या फांद्या पावसाळ्यापूर्वी तोडणे गरजेचे होते. मात्र कुठल्याही उपाययोजना न झाल्यामुळे लाईट वारंवार जात असून दोन दोन दिवस केडगाव अक्षरशा अंधारात राहत आहे. आता महावितरण प्रशासनाकडून दुरुस्तीचे काम हाती घेतले जाणार असून एकाच दिवशी संपूर्ण कामे मार्गी लावणार आहे. कर्मचाऱ्यांची संख्या कमी असल्यामुळे नागरिकांचे प्रश्न मार्गी लावण्यासाठी बरेच दिवस वाट पहावी लागते. त्यामुळे कर्मचारी संख्या वाढवावी अशी मागणी मनोज कोतकर यांनी केल्यानंतर केडगाव उपनगराचे दोन भागात विभागणी केली जाणार असल्यामुळे कर्मचारी देखील वाढवून दिले जाणार असल्याचे महावितरण कार्यालयाकडून सांगण्यात आले आहे.


महावितरणच्या अधिकाऱ्यांसमवेत बैठकीत चर्चा करताना मनोज कोतकर आदी. (छाया – लहू दळवी)

यावेळी मनोज कोतकर यांनी नागरिकांना लाईट बिल जास्त येत असल्याने स्मार्ट मीटर बसवण्यास विरोध केला. यावेळी महावितरण कंपनीने सांगितले की, नागरिकांनी स्मार्ट मीटर बसून घेतल्यास सकाळी १० ते संध्याकाळी ६ या वेळेत एका युनिट मागे ८० पैसे कमी केले जाणार आहे. त्यामुळे नागरिकांना लाईट बिल देखील कमी येणार आहे. तसेच रीडिंग घेण्यासाठी कर्मचाऱ्यांचा येणारा खर्च कमी होणार आहे. नागरिकांनी स्मार्ट मीटर बसून घ्यावे काही नागरिकांना जास्त लाईट बिल आले असेल सिस्टीम डेव्हलपमेंटचे काम सुरू असल्यामुळे हा प्रॉब्लेम झाला आहे. पुढील बिलामध्ये वाढीव आलेले पैसे कमी केले जाणार आहे. तसेच केडगाव वीज तक्रार मुक्त करण्याचे आश्वासन महावितरण कार्यालयाकडून देण्यात आले आहे. नागरिकांना महावितरण कार्यालयाकडे मोबाईल वरून तक्रार करता येणार आहे. यासाठी महावितरण कार्यालयाचा मोबाईल नंबर ९९३०३९९३०३ असून यापुढे एम आर इ जी व ग्राहक नंबर टाकावा व ग्राहकांनी तक्रार करावी त्याचे निवारण देखील तातडीने केले जाईल असे आश्वासन या बैठकीमध्ये देण्यात आले असल्याची माहिती मनोज कोतकर यांनी दिली.

## दर महिन्याच्या ५ तारखेआधीच पेन्शन होणार जमा

### जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी यांची आश्वासनाची पुर्तता

नगर – जिल्हा परिषदेत अहिल्यानगर पेन्शनर असोसिएशनच्या माध्यमातून अदालत पार पडली. मुख्य कार्यकारी अधिकारी आनंद भंडारी व शिक्षणाधिकारी भास्कर पाटील यांच्या उपस्थितीमध्ये झालेल्या बैठकीत दिलेल्या आश्वासनाप्रमाणे दर महिन्याच्या ५ तारखेच्या आत सर्व पेन्शनधारकांची पेन्शन जमा होणार असल्याचे संघटनेला अनुदानपत्र प्राप्त झाले असून, या निर्णयाचे संघटनेतर्फे स्वागत करण्यात आले आहे.

या अदालतीत आनंद भंडारी यांनी पेन्शन संदर्भातील धोरण स्पष्ट केले. तसेच अंश राशीकरण, उपदान रक्कम, निवड श्रेणी व प्रलंबित मुद्यांवर तातडीने निर्णय घेण्यात येणार असल्याचे जाहीर केले. त्यामुळे अनेक महिन्यांपासून रखडलेले प्रश्न मार्गी लागण्याचा मार्ग मोकळा झाला आहे. संगणक वसुलीबाबत देखील लवकरच रक्कम मिळणार असल्याचे प्रशासनाने स्पष्ट केल्याने, संबंधित लाभार्थींमध्ये समाधान व्यक्त होत आहे.

महाराष्ट्र राज्य पेन्शनर्स असोशिएशनच्या विविध मागण्यांबाबत शिक्षण संचालक पुणे यांच्याशी लवकरच बैठक घेण्यात येणार आहे. या बैठकीसाठी आमदार सत्यजीत तांबे यांना निवेदन देण्यात आले असून, ते लवकरच पुढाकार घेणार असल्याचे संघटनेच्या वतीने सांगण्यात आले.

पेन्शनच्या निर्णयाने सर्व पेन्शनधारकांमध्ये आनंदाचे व समाधानाचे वातावरण आहे. अहिल्यानगर पेन्शनर असोसिएशन जिल्ह्यातील पेन्शनधारकांचे प्रश्न वेळोवेळी प्रशासनाकडे मांडत आहे. उर्वरित प्रलंबित मागण्यांसाठीही पाठपुरावा सुरू असून, लवकरच त्या सोडवल्या जातील असा विश्वास व्यक्त करण्यात आला आहे. पेन्शनर्सचे विविध प्रश्न सुटण्यासाठी अहिल्यानगर पेन्शनर असोसिएशनचे दशरथ ठुबे, सरचिटणीस बन्सी उबाळे, कार्याध्यक्ष रावसाहेब पवार, उपाध्यक्ष विनायक कोल्हे, सुखदेव वांडेकर, ज्ञानदेव लंके, धोंडीबा गांगर्डे, सोमनाथ कळसकर, बापूसाहेब कर्पे, कारभारी शिकारे, भाऊसाहेब लावरे, ज्ञानदेव थोरात, रामचंद्र ठोंबरे, भाऊसाहेब गोरे, अविनाश गांगर्डे, प्रताप आंब्रे, बेबीताई तोडमल, शामला साठे, निनाबाई जोंधळे, गजानन ढवळे, मुरलीधर देशमुख आदी प्रयत्नशील आहेत.

# वन विभागातील अनियमितता व बदल्याप्रकरणी चौकशीचे आदेश

नगर – अहिल्यानगर जिल्ह्याच्या वन विभागातील अनियमिता, कर्मचारी व अधिकाऱ्यांच्या नियुक्त्या, वन्य प्राण्यांच्या हत्येच्या चौकशीच्या मागणीसाठी जनहितार्थ जन आक्रोश संघटनेच्या वतीने नाशिक येथील प्रादेशिक मुख्य वनसंरक्षण कार्यालया समोर उपोषण करण्यात आले.


रघुनाथ आंबेडकर यांच्या नेतृत्वाखाली झालेल्या उपोषणाची दखल घेऊन प्रादेशिक मुख्य वनसंरक्षक जी.मल्लिकार्जुन यांनी तात्काळ चौकशीचे आदेश दिले.

संघटनेचे प्रदेश कार्याध्यक्ष रघुनाथ आंबेडकर यांच्या नेतृत्वाखाली झालेल्या या उपोषणाची दखल घेऊन प्रादेशिक मुख्य वनसंरक्षक जी.मल्लिकार्जुन यांनी तात्काळ चौकशीचे आदेश दिले. या आंदोलनास संघटनेचे संस्थापक अध्यक्ष अरुण आंधळे पाटील व सावली दिव्यांग संघटनेचे अध्यक्ष बाबासाहेब महापुरे यांनी पाठींबा दिला. यावेळी जिल्हाध्यक्ष योगेश कुलथे, बाबासाहेब डोळस, बबनराव झरेकर, विजय सासवडे, हरेश्वर साळवे, जेष्ठ महिला शांताबाई आंबेडकर आदी उपस्थित होते.

वनविभागातील ६१ बदली प्रक्रियात अनियमिता तसेच वर्षानुवर्षे एकाच ठिकाणी कर्मचारी व अधिकाऱ्यांच्या नियुक्त्या, वन्य प्राण्यांच्या हत्ये नंतर गुन्हेगारांना अभय देण्याचा करण्यात येणारा प्रयत्न यासंदर्भात चौकशी करण्याची संघटनेच्या माध्यमातून मागणी करण्यात आली होती. या संदर्भात माहिती देण्यासही कार्यालयाकडून टाळाटाळ केली जात होती. कारवाई होत नसल्याने आंबेडकर यांनी आंदोलनाचा पवित्रा घेतला होता.

प्रादेशिक मुख्य वनसंरक्षक जी. मल्लिकार्जुन यांनी उप वनसंरक्षक अहिल्यानगर यांना पत्र देऊन वनपरिक्षेत्र अधिकारी यांच्या कार्यक्षेत्रातील शिकार प्रकरणांमध्ये न्यायालयात तात्काळ चार्जशीट दाखल करावे, वनपरिक्षेत्र अधिकारी, टाकळी ढोकेश्वर, तालुका पारनेर यांच्या कार्यालयात जाणे–येणे करिता शेतकऱ्यांना, जेष्ठ नागरिक आणि सामान्य नागरिकांना त्रास होत असल्याने वनपरिक्षेत्र अधिकारी यांनी चांगला रस्ता उपलब्ध करून द्यावा तसेच विभागीय कार्यालयातील वनपरिक्षेत्र अधिकारी अहिल्यानगर, पारनेर, टाकळी ढोकेश्वर, तिसगाव व राहुरी यांच्या कार्यालयाबाबत असणाऱ्या तक्रारीची माहिती देण्यात यावी व टाकळी ढोकेश्वर वनपरिक्षेत्रातील गारगोटी उत्खनन व झाडे तोडीच्या घटना घडल्याच्या तक्रारीची दखल घेऊन अति तात्काळ चौकशी करण्याचे लेखी आदेश देऊन तात्काळ अहवाल मागविला आहे. हे लेखी पत्र संबंधित विभागाकडून मिळाल्याने उपोषण मागे घेण्यात आले.

योग्य व पारदर्शक चौकशी होऊन अहवाल प्राप्त न झाल्यास संस्थापक अध्यक्ष भाऊसाहेब कांबळे यांच्या मार्गदर्शनाखाली पुन्हा मुंबईच्या आझाद मैदानात अर्धनग्न आंदोलन करण्याचा इशारा रघुनाथ आंबेडकर यांनी दिला आहे.



आर्थिक जागरूकता अभियानाबद्दल राजेश देशपांडे यांचा सन्मान करण्यात आला.

## आर्थिक जागरूकता अभियानाबद्दल नगरचे राजेश देशपांडे यांचा सन्मान

नगर – आर्थिक व गुंतवणूक जागरूकता यासाठीचे आउटलूक बिझनेस नॅशनल ॲवॉर्ड २०२५ अहिल्यानगर येथील देशपांडे इन्वेस्टमेंटचे संचालक राजेश देशपांडे यांना मिळाले. नॅशनल स्टॉक एक्सचेंजचे सीईओ आशिषकुमार चव्हाण, स्पेशल चीफ सेक्रेटरी डॉ. जे ए चौधरी यांच्या प्रमुख उपस्थितीत बेंगळुरू येथे हा कार्यक्रम झाला.

मागील १५ वर्षांपासून अहिल्यानगर शहर व महाराष्ट्रातील ग्रामीण भागामध्ये जनतेतील सर्वच उत्पन्न गटातील (उच्च, मध्यम व अल्प) नागरिकांसाठी राजेश देशपांडे अनेक सरकारी व खाजगी संस्थांच्या मदतीने आर्थिक व गुंतवणूक जागरूकतेचे कार्य करीत आहेत. समाजातील सर्वच उत्पन्न गटातील नागरिकांमध्ये आर्थिक व गुंतवणूक जागरूकता वाढणे गरजेचे आहे कारण शेअरबाजार व क्रिप्टो करन्सी अथवा फॉरेक्सच्या नावाखाली सामान्य नागरिकांच्या फसवणुकीचे प्रकार दिवसेंदिवस वाढत आहे असे त्यांचे मत आहे.

